खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे. ४१० ५०५

## प्रथम वर्ष कला

## द्वितीय सत्र

## भूगोल ( जी– १ )

### विषय -Gg 110 (B) भूगोल (मानवी भूगोल)

## प्रा. दिलीप ज्ञानेश्वर मुळूक

भूगोल विभाग

शैक्षणिक वर्ष २०१९ – २०२०पासून

HRMGEOG

# प्रकरण पहिले- मानवी भूगोलाचा परिचय

## अभ्यास घटक –

१. मानवी भूगोल – व्याख्या आणि अर्थ

२. मानवी भूगोलाचे स्वरूप आणि व्याप्ती

३. मानवी भूगोलाच्या शाखा आणि महत्त्व

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

## राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे ४१०५०५

### नवीन अभ्यासक्रम सेमीस्टर पॅटर्न २०१९

### द्वितीय सत्र अभ्यासक्रम

वर्ग - प्रथम वर्ष कला (FYBA)

विषय - Gg 110 (B) भूगोल (मानवी भूगोल)

| अ. नं. | घटक | उपघटक | तासिका | एकूण श्रेयांक |
|---|---|---|---|---|
| 1. | मानवी भूगोलाचा परिचय | 1. मानवी भूगोल – व्याख्या आणि अर्थ<br>2. मानवी भूगोलाचे स्वरूप आणि व्याप्ती<br>3. मानवी भूगोलाच्या शाखा आणि महत्त्व | 12 | 03 |
| 2. | लोकसंख्या | 1. लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक<br>2. लोकसंख्या संक्रमण सिंध्दात<br>3. भारतीय लोकसंख्येची संरचना (लिंगरचना आणि साक्षरता) | 12 | |
| 3. | वसाहती | 1. ग्रामीण वस्त्यांचे प्रकार आणि प्रारूप (आकृतीबंध)<br>2. भारतातील नागरीकरण<br>3. महाराष्ट्रातील नागरीकरण | 12 | |
| 4 | कृषी / शेती | 1. शेतीचे प्रकार<br>2. शेतीवर परिणाम करणारे घटक<br>3. भारतीय शेतीसमोरील समस्या | 12 | |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रथम वर्ष द्वितीय सत्रासाठी कला भूगोल विषयाच्या पाठ्यक्रमाचा अनुवाद

# प्रकरण पहिले

# मानवी भूगोलाचा परिचय

## मानवी भूगोल (Human Geography)

१. मानवी भूगोलाच्या व्याख्या आणि अर्थ

२. मानवी भूगोलाची स्वरूप आणि व्याप्ती

३. मानवी भूगोलाच्या शाखा

४. मानवी भूगोलाचे महत्त्व

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून निसर्गाविषयी मानवाला कुतूहल वाटत आले आहे. या कुतूहलापोटी आणि जिज्ञासेपोटी विज्ञानाची प्रगती झाली. आपल्या दैनंदिन जीवनात पृथ्वीच्या पृष्ठभागावर अवतीभोवती अनेक नैसर्गिक घटना घडत असतात. उदा. सुर्य उगवतो, मावळतो, ऋतूचक्र घडून येते, पाऊस, वादळे, पूर, भूकंप, ज्वालामुखी यांसारख्या अनेक घटना आपण पहात असतो. या घटना विषयी आकलन होणे म्हणजेच ज्ञान होय. या प्रकारच्या घटनांची सुसंगत मांडणी करण्यासाठी त्या घटनेला **काय? कसे? केव्हा? कोठे? आणि का?** यासारखे प्रश्न विचारले असता त्या प्रश्नांची समर्पक उत्तरे मिळतात व यातूनच विज्ञानाची सुरूवात झाली. कोणत्याही प्रकारच्या ज्ञानाची सुसंगत मांडणी करणे म्हणजे विज्ञान होय. **निरीक्षण, प्रयोग, वर्गीकरण, अनुमाने** यांच्याद्वारे निसर्गातील विविध घडामोडींचे सुत्रबध्दपणे, पद्धतशीरपणे ज्ञान मिळवता येते. या प्रकारच्या ज्ञानाची पद्धतशीर मांडणी अनेक विद्यशाखांद्वारे करण्यात आली आहे. त्यापैकी एक महत्त्वाची विद्याशाखा म्हणजे भूगोल होय. भूगोल ही विज्ञानाची प्रगत शाखा आहे. कारण भूगोल या विषयाअंतर्गत ज्या ज्या घटकांचा अभ्यास केला जातो. त्या प्रत्येक घटकांना विज्ञानाच्या विविध कसोट्यांवर तपासून पाहता येते.

भूगोल या नावाने परिचित असलेल्या विषयास **'भूगोलविद्या' अथवा 'भूवर्णशास्त्र'** असेही म्हणतात. याचे मुख्य कारण म्हणजे भूगोलाची पारंपारिक व्याख्या व व्याप्ती यामध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत व होत आहेत. आधुनिक काळात भूगोलास 'शास्त्र' म्हणून स्थान मिळाले आहे. बदलत्या काळानुसार सामाजिक शास्त्रांबरोबर नैसर्गिक शास्त्रांमध्ये म्हणजे विज्ञानातही भूगोलाचे स्थान महत्वाचे मानले जात आहे. भूगोलशास्त्राची सुटसुटती व्याख्या **'पृथ्वीसंबंधी माहीती देणारे शास्त्र'** अशी करता येईल. अभ्यासाच्या सोयीकरिता पृथ्वीचे वर्णन नैसर्गिक, भौगोलिक तसेच राजकीय भाग पाडून केले जाते. या भूपृष्ठवर्णनात

पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एखादया प्रदेशातील खडक, हवामान, प्राणी, वनस्पती, शेती, साधनसंपत्ती, दळणवळण, इत्यादी माहितीचा अंतर्भाव होतो. भूगोलशास्त्राचा दुसरा मुलभूत घटक म्हणजे **मानव व पर्यावरण यांचे परस्पर व नेहमी बदलत असणारे संबंध** आणि या संबंधाचे पृथ:करणात्मक विवेचन करण्याकडे भूगोलशास्त्राचा कल आहे. आठराव्या शतकापर्यंत भूगोलशास्त्राचे स्वरूप पृथ्वीच्या पृष्ठभागावरील स्थलनामांची नोंद ठेवणे इतपर्यंतच मर्यादीत होते. आजमितीस भूगोलाचे स्वरूप अतिशय व्यापक झाले आहे. अनेक विद्याशाखांच्याव्दारे भूगोलाचा सखोल अभ्यास केला जातो.

प्राचिन काळापासून मानवाच्या स्थंलातरीय प्रवृत्तीमुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील नवनवीन प्रदेशाचा शोध लागला. प्राचिन काळापासून ग्रीक, रोमन, फ्रेंच भूगोलकारांनी भौगोलिक ज्ञानाचा प्रचंड प्रसार केला. त्यांनी अनेक भौगोलिक ग्रंथ लिहीले. नकाशे तयार केले. मध्ययुगीन कालखंडात ज्या विविध सफरी झाल्या त्यातून संपूर्ण जगामध्ये भूगोलाला महत्त्व प्राप्त झाले. आधुनिक काळात भौगोलिक अभ्यासाची साधनसामुग्री वाढली असून नकाशाशिवाय हवाई छायाचित्रे, उपग्रहांद्वारे घेतलेली छायाचित्रे, भौगोलिक माहिती प्रणाली, सुदूर संवेदन प्रणाली इत्यांदीचा वापर केला जातो. व आजच्या आधुनिक युगामध्ये भौगोलीक ज्ञानाविषयी प्रचंड कुतूहल निर्माण झाल्याचे दिसून येते. या भौगोलिक इतिहासाच्या नोंदीचा भूगोलाचा अभ्यास करताना आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. भूगोलाच्या प्रगतीचा प्राचीन काळापासूनचा आढावा घेतल्यास पुढील मुद्द्यांना धरून विवेचन करावे लागेल.

**१.भूपृष्ठावरील प्रदेशाच्या शोधनाचा स्थूल इतिहास**

१. इ.स.पू. चौदाव्या शतकात ईजिप्शियन व फिनिशियन लोंकानी केलेले मध्यपूर्वेतील देशांचे व नाईल नदी खोऱ्याचे शोधन.

२. इ.स.पू. २३०० मेसोपोटामियामध्ये दगडावर कोरलेला नकाशा.

३. इ.स.पू. ४८४ –४२५ हीरॉडोटसने केलेले तांबडया समुद्राचे वर्णन आणि ज्ञात जगाचा नकाशा बनविला.

४. इ.स.पू. ३२७ अलेक्झांडरची भारतीय उपखंडावरील स्वारी त्याची प्रवास वर्णने.

५. इ.स.पू. २४० इरेस्टोस्थेनीस ने पृथ्वीच्या परिघाची गणना केली. जिऑग्राफी शब्दाचा प्रथम प्रयोग.

६. इ.स. ७९ हिप्पालस – मोसमी हवामानातील ऋतूविषयक माहितीचे संकलन.

७. इ.स.५२७ ते ५६५ रोमन सम्राट जस्टिनिअन याच्या कारकीर्दीत नेस्टोरियन पंथाचे धर्मप्रसारक कॉन्स्टॅटिनोपलपासून चीनपर्यंत गेले.

८. इ.स. १४१० टॉलमेचा जिऑग्राफिया हा महत्वपूर्ण ग्रंथ.

९. इ.स. १५६९ मर्केटरद्वारे नकाशा प्रक्षेपणांची रचना.

१०.इ.स. १० व्या शतकात एरिक द रेड व त्याचा मुलगा एरिकसन लेव्ह या नार्स दर्यावर्दीनी केलेले उत्तर ध्रुवीय प्रदेशाचे शोधन. यांनी ग्रीनलंड व अमेरिका खंडाचा शोध लावला.

११.इ.स. (१२५४ – १३२४) मार्कोपोलो याने आशिया आफ्रिका यांच्या दरम्यान खुष्कीचा मार्ग शोधून चीन व हिंदुस्थानचे केलेले प्रवासवर्णन.

१२.इ.स. (१३०४ – १३७८) इब्न बतूता या अरबी प्रवाशाने अरबस्तान, इराण, चीन, हिंदुस्थान, मलाया व सहारा वाळवंटाचे केलेले प्रवास वर्णन.

१३. इ.स. १४८८ पोर्तुगिजांनी आफ्रिकेचे दक्षिण टोक शोधले. व वास्को दी गामा हा प्रवासी हिंदुस्थानला पोहचला.

१४. इ.स. १४९२ क्रिस्तोफर कोलंबस अमेरिका खंडाच्या पूर्वेकडील वेस्ट इंडीज बेटावर पोहचला. खरेतर कोलंबस पश्चिमेकडे हिंदुस्थानकडे जाण्याचा मार्ग शोधत होता.

१५. इ. स. १८३० लंडनमध्ये रॉयल जिओग्राफीकल सोसायटीची स्थापना.

१६. इ. स. १८४५ हम्बोंटद्वारे कॉसमॉस ग्रंथाचे लेखन

१७. इ. स. १८५० फ्रांन्समध्ये नकाशानिर्मितीसाठी कॅमेऱ्याचा उपयोग.

१८. इ. स. १८८८ नॅशनल जिओग्राफीक सोसायटीची स्थापना.

१९. इ. स. १९०९ पेअरी उत्तर ध्रुवावर पोहचला.

२०. इ. स. १९१३ ग्रीनविच शहरावरून जाणाऱ्या रेखावृत्तास $0^\circ$ रेखावृत्त म्हणून स्विकारले.

**भूगोलाची व्याख्या**

**मानवी भूगोल ही भूगोलाची एक महत्त्वाची शाखा आहे.** त्यामुळे मानवी भूगोलाचा तर्कसंगत अभ्यास करण्यापूर्वी भूगोलाची व्याख्या समजावून घेणे अत्यावश्यक आहे. भूगोलाच्या व्याख्येमध्ये काळानुरूप बदल होत गेल्याचे दिसून येते. अगदी प्रारंभीक अवस्थेत पृथ्वीवर ज्या ज्या गोष्टी मानवाला आढळल्या त्या सर्वांचे निरीक्षण करून नोंद केली गेली व ती भूगोलाची सुरूवात होय.

**इरेस्टोस्थेनीस** या भूगोलवेत्त्याने पृथ्वीच्या वर्णनासाठी सर्वात प्रथम **जिऑग्राफी *(Geography)*** हा शब्दप्रयोग केला. या शब्दामधील ***Geo* म्हणजे पृथ्वी आणि *Graphy* म्हणजे वर्णन.**

१. प्रारंभीक अवस्थेत **पृथ्वीचे वर्णन करणारे शास्त्र म्हणजे भूगोल** अशी व्याख्या करण्यात आली.

**२. ''पृथ्वीच्या पृष्ठभागावरील घटनादृष्यांचा अभ्यास म्हणजे भूगोल होय''**

**३. ''भूगोल ही अशी ज्ञानशाखा आहे की ज्यामध्ये मानव जातीच्या संदर्भात भूपृष्ठाच्या बहुविविधतेच्या अभ्यास केला जातो.'' – *कार्ल रिटर***

४. ''भूगोल हे असे शास्त्र आहे की ज्यामध्ये प्रादेशिक विभिन्नतेचा व प्रदेशा–प्रदेशातील परस्परसंबंधाचा अभ्यास केला जातो.”– *ब्रिटीश परिशिष्ट मंडळ.*


५. “सृष्टीतील भौतिक, निर्जिव घटक व तत्वे आणि सजीव घटकांची प्रक्रिया यांच्यातील परस्पर संबंधाचे शास्त्र म्हणजे भूगोल होय.”

६. “पृथ्वीच्या पृष्ठभागावरील मानवी क्रियाप्रक्रियांचा अभ्यास म्हणजे भूगोल होय.”

७. “भूपृष्ठ हे मानवाचे वसतिस्थान गृहीत धरून भूपृष्ठाच्या व मानवाच्या घनिष्ठ संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे भूगोल होय.” – *आंतरराष्ट्रीय भूगोल परिषद*

८. “भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे भूगोल होय.”


थोडक्यात पृथ्वीच्या पृष्ठभागाचा **मानवजातीच्या संदर्भात शास्त्रीय पध्दतीने** अभ्यास भूगोल या विषयात केला जातो. हा अभ्यास करत असताना मानव व भूपृष्ठ, मानव आणि नैसर्गिक उपयुक्तता हा मध्यबिंदू लक्षात घेवून अभ्यास केला जातो. वरील व्याख्यांच्या अभ्यासावरून असे दिसून येते कि भूगोलात केवळ प्राकृतिक रचनेला महत्व दिलेले नाही किंवा **मानवालाही महत्व** दिलेले नाही. प्रदेशातील बदलत्या परिस्थितीनुरूप मानव मिळते घेऊन मानव आपली प्रगती करत असतो. म्हणून भूगोलाचा अभ्यास हा **मानव आणि त्याचा निसर्गाशी** असणारा संबंध यांचा अभ्यास आहे असे म्हणणे उचित ठरेल.




भूगोल या विषयाचा अभ्यास करण्यास सुरूवात झाली तेव्हा त्याची व्याप्ती फारच कमी होती. परंतु बदलत्या काळानुसार त्याची व्यापकता वाढत गेली व आधुनिक काळात नैसर्गिक अनेक बाबींचा अभ्यास भूगोलाच्या विविध शाखांद्वारे करण्यास सुरूवात झाली. व आज ८७ पेक्षा अधिक भूगोलाच्या उपशाखा आहेत. विसाव्या शतकाच्या मध्यातंरानंतर भूगोल विषयाचा अभ्यास **नैसर्गिक बाबींपुरताच मर्यादीत न राहता मानवनिर्मित घटकांचाही अभ्यास शास्त्रीय पध्दतीने भूगोलामध्ये केला जाऊ लागला.** सदय स्थितीत भूगोलाच्या महत्त्वाच्या दोन शाखा आहेत **प्राकृतिक भूगोल** आणि **मानवी भूगोल** व या प्रमुख दोन शाखांच्या अनेक उपशाखा यांद्वारे आजमितीस भूगोलाचा अभ्यास केला जातो. प्राकृतिक भूगोलामध्ये **नैसर्गिक घटकांचा** अभ्यास केला जातो. पृथ्वीच्या पृष्ठभागावर आढळणाऱ्या जैवीक आणि अजैविक तत्वांचा अभ्यास


प्राकृतिक भूगोलामध्ये केला जातो. तर मानवी भूगोलामध्ये **मानव आणि मानवी क्रिया आणि मानवनिर्मित प्रत्येक घटकांचा** अभ्यास केला जातो. त्यामुळे भूगोलाच्या प्राकृतिक भूगोल आणि मानवी भूगोल या दोन प्रमुख शाखा आहेत. प्राकृतिक भूगोलामध्ये आपण भपृष्टावरील प्राकृतीक किंवा नैसर्गिक घटकांचा अभ्यास करतो. मानवी भूगोल ही भूगोलाची अलीकडील काळात विकसीत झालेली एक अत्यंत महत्त्वाची आधुनिक शाखा मानली जाते. १८ व्या शतकापासून वेगवेगळया भूगोल तज्ञांनी मानवी भूगोलाच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले आहे. **फ्रान्स, जर्मनी, इंग्लड, अमेरिका, रशिया** या देशांमध्ये अनेक भौगोलिक ग्रंथ विकसीत झाले. या सर्व ग्रंथसंपदेमध्ये मानवी भूगोलाच्या अभ्यासावर सविस्तर प्रकाश टाकण्यात आला. मानवाचे निसर्गाशी असणारे अतुट नाते आणि मानव आणि निसर्ग यांच्यामधील आंतरक्रिया यांचा सखोल अभ्यास या लिखाणामध्ये केला आहे. मानवाने आपली भौतीक प्रगती करत असताना निसर्गाला अधिन राहून कशा प्रकारे केली आहे. किंवा मानवी उत्क्रांती होत असताना निसर्गातील मानवाचे स्थान या बाबींचे सविस्तर विश्लेषण या लिखाणामधून करण्यात आले आहे. १८ व्या शतकामध्ये **बुशिंग, बुआख, जॉन फॉर्स्टर आणि इमॅन्युअल कांट** या जर्मन भूगोलतज्ञांनी मानवी भूगोलाच्या संदर्भातील लेखन करून मानवी भूगोलाला एक महत्त्वाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. १९ व्या शतकामध्ये खऱ्या अर्थाने मानवी भूगोलाचा पाया भक्कम झाला असे म्हणावे लागेल. या कालखंडामधील विविध भूगोलकारांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. या कालखंडातील **अलेक्झांडर व्हॉन हंम्बोल्ट, कार्ल रिटर, फ्रिडरिश रॅटझेल,** या जर्मन भूगोल तज्ञांनी मानवी भूगोलाच्या अभ्यासामध्ये महत्त्वाचे योगदान दिले.

**फ्रेडरिक विल्यिम हेनरिक अलेक्झांडर व्हॉन हंम्बोल्ट (Friedrich Wilhelm Heinrich Alexander von Humboldt)** या जर्मन भूगोलवेत्यांने **'कॉसमॉस'** या ग्रंथाचे एकूण चार खंड लिहीले. या ग्रंथामधून हंम्बोल्ट यांनी आपल्या प्रदीर्घ प्रवासाच्या दरम्यान केलेल्या निरिक्षणांच्या अधारे मानव आणि हवामानाच्या बदलाच्या घटनांचे सविस्तर वर्ण केले आहे. हंम्बोल्ट यांचे कार्य ८ जागतिक भाषांमध्ये प्रकाशित झाले. हंम्बोल्ट यांना **'आधुनिक भूगोलाचे जनक'** असे म्हणतात.



**अलेक्झांडर व्हॉन हंम्बोल्ट (Alexander von Humboldt)** 1769 -1859

**कार्ल रिटर** (Carl Ritter) यांचे आधुनिक भूगोलाच्या अभ्यासातील योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. १८१७ मध्ये रिटर यांनी **'एर्डकुन्ड' (Erdkunde)** या ग्रंथाचे लेखन प्रसिध्द झाले. या ग्रंथाचे १९ खंड नंतरच्या काळात प्रकाशित करण्यात आले. या सर्व ग्रंथामध्ये रिटर यांनी मानव आणि प्राकृतिक घटकांमधील सहसंबंध स्पष्ट करत असताना आफ्रिका, पूर्व आशिया, पश्चिम आशिया, अरेबिया, सिनाई द्विपकल्प आणि अशिया खंड या संदर्भात आपले लेखन केले आहे.



**कार्ल रिटर (Carl Ritter) 1779-1859**

जर्मन भूगोल तज्ञ **फ्रिडरिश रॅटझेल** (Fredrick Ratzel) यांना **'मानवी भूगोलाचा जनक'** असे म्हणतात. रॅटझेल यांनी मानवी भूगोलाच्या अभ्यासाच्या संदर्भात **'ॲन्थ्रोपोजिऑग्राफी'** (Anthoropogeography) हा ग्रंथ १८८२ प्रकाशित झाला. या ग्रंथात त्यांनी पृथ्वी तत्वाशी किंवा नैसर्गिक घटनांशी मानवाचा असणारा संबंध यांचे सुसंबध्द आणि शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण केले आहे. या ग्रंथाचे दोन भाग प्रकाशित झाले त्यामुळे मानवी भूगोलाच्या विकासाला मोठया प्रमाणात चालना मिळाली.



**फ्रिडरिश रॅटझेल (Fredrick Ratzel) 1844-1904**

२० शतकामध्ये जर्मन भूगोलतज्ञांनी मानवी भूगोलाच्या विकासाला मोठया प्रमाणात गती दिली. यामध्ये **फ्रोबेल, रिशथॉफेन, आल्फ्रेड हेटनर** यांचे योगदान महत्त्वाचे होते. या शिवाय फ्रेंच भूगोल शास्त्रज्ञ **व्हिदाल–द–ला–ब्लाश** यांनी संभववादाची संकल्पना मांडली. ब्लाश यांनी भूगोलाच्या अभ्यासासाठी **'फ्रेंच स्कूल ऑफ जिऑग्राफीची'** स्थापना केली. ब्लाश यांनी भूगोल अभ्यासासंदर्भात १७ पुस्तके आणि १०७ शोधनिबंधाचे लेखन केले. १९०१मध्ये **जीन्स ब्रुन्स** यांचा **'मानवी भूगोल'** नावाचा ग्रंथ प्रकाशित झाला. या

ग्रंथामध्ये त्यांनी आपल्या परिसरातील मानवाने केलेल्या बदलांचा अभ्यास केला आहे. **ब्रिटीश भूगोल अभ्यासक हर्बर्टसन, मॅकिंडर, डडले, स्टॅम्प** यांनीही मानवी भूगोलाच्या अभ्यासामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. **अमेरिकन भूगोलतज्ञ डेव्हड हार्वे, जॉर्ज मार्श, कु एलेन सेंम्पल, ग्रिफिथ टेलर, रिचर्ड हार्टशार्न, कार्ल सॉयर, ईसा बोमेन** यांनीही मानवी भूगोलाच्या अभ्यासामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे. भूगोलाच्या त्यांनतरच्या कालखंडातही मानवी भूगोलाच्या अभ्यासामध्ये प्रगती झाली.

मानवी भूगोल ही प्राकृतिक भूगोलाच्या पायावरच उभी राहिलेली परंतु मानवनिर्मित गोष्टींचा अभ्यास करणारी व प्राकृतिक घटकांचा त्यांच्यावर होणारा परिणाम अभ्यासणारी शाखा आहे. मानवी भूगोलामध्ये **मानव व त्यांचे नैसर्गिक पर्यावरण** यांच्या संबंधांचा अभ्यास केला जातो. मानवी जीवनावर नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव पडतो. उपलब्ध नैसर्गिक पर्यावरणाच्या घटकातून प्राप्त होणाऱ्या साधन संपत्तीचा वापर करून मानव आपले जीवन जगतो, आर्थिक क्रिया अथवा व्यवसाय करतो. आपला आर्थिक विकास करून घेतो या सर्वांचा समावेश मानवी भूगोलात केला जातो. मानवी भूगोल ही भूगोलाची एक महत्त्वाची शाखा असून मानवी भूगोलाचा संबंध मानवाच्या निसर्गातील विविध आंतरक्रियांशी आहे. मानवाच्या विविध कृतींचे परिणाम निसर्गावर होत असतात. तसेच निसर्गातील विविध घटनांचा परिणाम मानवावर होत असतो. त्यामुळे मानव आणि निसर्ग यामधील सहसंबधाचा सखोल अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो. मानवी भूगोलामध्ये नैसर्गिक घटकांचा अभ्यास करत असताना मानव हा मुख्य केंद्रबिंदू मानून अभ्यास केला जातो. त्यामुळे भौगोलिक ज्ञान आणि मानव यांच्या एकत्रित अभ्यासातून मानवी भूगोल ही भूगोलाची अलीकडील काळात विकसीत झालेली महत्त्वाची शाखा आहे. निसर्गातील अनेक घटकांचा मानवी दृष्टीकोनातून अभ्यास करत असताना मानवाच्या विविध पैलूंचा स्वतंत्रपणे अभ्यास होऊ लागला त्यामुळे मानवी भूगोलाच्या देखील अनेक उपशाखा निर्माण झाल्या. मानवाच्या उत्क्रांतीपासून आधुनिक मानवापर्यंत मानवाच्या विविध क्रियां जसजशा वाढत गेल्या आहेत त्या सर्व घटकांचा परामर्श मानवी भूगोलाच्या विविध शाखांद्वारे घेतला जातो आहे. त्यामुळे मानवी भूगोलाची व्याप्ती मोठया प्रमाणात वाढली आहे. मानवाचे निसर्गाशी अतिशय घनिष्ठ नाते आहे. मानवाचे **आहार, विहार, संस्कृती, चालीरिती, रूढी परंपरा, व्यवसाय, या सर्व घटकांवर निसर्गाचाच प्रभाव असतो.** थोडक्यात मानवाच्या प्रत्येक कृतीकार्याचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो. मानवी भूगोलाच्या व्याख्या विविध तज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे

## मानवी भूगोलाच्या व्याख्या आणि अर्थ (Definitions of Human Geography)

मानव आणि पर्यावरण किंवा निसर्ग यांच्या सहसबंधातून मानवी भूगोलाचा विकास झालेला आहे. भूपृष्ठावरील मानवी जीवनामध्ये मोठया प्रमाणात विविधता असली तरी मानवी जीवन जगण्याची शैली मात्र सर्वत्र सारखीच आहे. मानवी भूगोलाची व्याख्या तयार करताना त्यातील विविध दृष्टिकोण लक्षात घेतले

पाहिजेत. या विषयाच्या अभ्यासकांनी जसे हे विविध दृष्टिकोण विकसित केले तसा या विषयाचा आशय व व्याख्या बदलत गेली. निरनिराळ्या शास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढे दिलेल्या आहेत

१. **''मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या पर्यावरणाच्या घटकांचा अभ्यास म्हणजे मानवी भूगोल होय. ''** – ***फ्रिडरिश रॅटझेल***
२. **''मानवी भूगोल म्हणजे अस्थिर पृथ्वी व चंचल मानव यांच्यातील बदलत्या संबंधांचा अभ्यास होय.** – ***कु. एलेन सेंपल***
३. **''नैसर्गिक नियम आणि मानवाच्या परस्पर संबंधातून एक नवीन विचार प्रस्तुतकरणारे शास्त्र म्हणजे मानवी भूगोल होय.''** – ***विदाल–दी– ला– लाश***
४. **''मानवी भूगोल म्हणजे मानवी व्यवसाय व नैसर्गिक घटक यांच्यातील संबंधांचा अभ्यास होय.''** – ***जीन्स ब्रुन्स***
५. **'' मानवसमूह व समाज यांचे नैसर्गिक पर्यावरणाशी असणारे संबंध अध्ययन करणारा विषय म्हणजे मानवी भूगोल होय.''** – ***दमॉंजिया***
६. **''भौगोलिक पर्यावरण व मानवी व्यवसाय गुण यांचे स्वरूप व परस्परसंबंध यांचा अभ्यास म्हणजे मानवी भूगोल.''** – ***हंटिंग्टन***
७. **''मानवी भूगोल म्हणजे नैसर्गिक पर्यावरण व मानवाची भौतिक प्रगती यांमधील कार्यकारणभावाचे संशोधन होय.''** – ***डेव्हिस***
८. **''मानवी भूगोलात पृथ्वीच्या पृष्ठभागाला अनुसरून मानवी समाजाचे अध्ययन केले जाते.''** – ***रेनर***
९. **''भूपृष्ठावरील मानवनिर्मित स्थिर व अस्थिर घटनांच्या स्थानिक आकृतिबंधनाचे वर्णन व विश्लेषण म्हणजे मानवी भूगोल.** – ***प्रा. डॉ. कॉक्स***
१०. **''मानव व पर्यावरणाशी संबंधित समस्या यांचा अभ्यास म्हणजे मानवी भूगोल होय''** – **लेबॉन**
११. **''मानवी जीवनाच्या बहुविध अंगांपैकी जी अंगे सतत बदलणाऱ्या मानव व निसर्ग यांच्यातील परस्परसंबंधामुळे एखाद्या प्रदेशात एक विशिष्ट प्रकारचे चित्र निर्माण करतात, त्यांचा अभ्यास म्हणजे मानवी भूगोल होय.''** – ***प्राध्यापक जोन्स***

अशा प्रकारे मानवी भूगोलाच्या वरीलप्रमाणे काही महत्त्वाच्या व्याख्या आहेत या सर्व व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, **भौगोलिक घटकांचा मानवी दृष्टीकोनातून केलेला अभ्यास म्हणजेच मानवी भूगोल होय**. मानवी भूगोल म्हणजे मानव व त्यांच्या सभोवतालचे पर्यावरण यांचा परस्पर संबंध व त्यातून निर्माण होणाऱ्या क्रिया प्रतिक्रिया यांचा अभ्यास करणारे शास्त्र होय. मानव व त्यांच्या सभोवतालचे पर्यावरण यात कायमचे बदल घडत असतात. मानवाच्या विविध क्रियांचा अभ्यास मानवी भूगोल करत असताना काळानुरूप


HRM GEOG

होणाऱ्या बदलांच्या नोंदी मानवी भूगोलामध्ये घेतल्या जातात. त्यामुळे मानवी भूगोलाची व्याख्या व त्याचे स्वरूप काळाप्रमाणे बदलत जाणारे आहे म्हणून मानवी भूगोलास गतीशील शास्त्र म्हणणे जास्त संयुक्त होईल.

****************

## मानवी भूगोलाचे स्वरूप

### १. वर्णनात्मक स्वरूप

लेखन कलेचा विकास झाल्यानंतर अनेक प्राचीन विद्वानांनी आपल्या प्रवास वर्णनामधून प्रदेशांचे केलेले जे वर्णन आहे त्यामधून भौगोलिक घटकांच्या अभ्यासाला गती मिळत असल्याचे दिसते. प्राचीन ग्रीक आणि रोमन भूगोलकारांनी पृथ्वीच्या प्रदेशांचे केलेले वर्णन, भारतीय प्राचीन **साहित्यामधील वर्णने** यांच्या अधारे **भौगोलिक प्रदेश, हवामान, मानवी संस्कृती** याबाबत सखोल माहिती मिळते. विविध तज्ञांनी मानवी जीवनाविषयी माहिती लिहीताना पर्वतीय प्रदेशातील मानवी जीवन, पठारी प्रदेशातील तसेच मैदानी प्रदेशातील मानवी जीवनाचवी सखोल विश्लेषण केले आहे. सुरूवातीलच्या काळात भौगोलिक माहिती फक्त शब्दांच्या माध्यमातून वर्णनात्मक स्वरूपात लिहीली दिसते. त्यामुळे ही सर्व माहिती वर्णनात्मक असल्याने प्राचीन भूगोल आणि मानवी भूगोलाचे स्वरूप वर्णनात्क असल्याचे दिसते.

### २. वितरणात्मक/वर्गीकरणात्मक स्वरूप:

विविध साहित्य प्रकारातून पृथ्वी आणि मानव यांच्यासंबंधीची जी वर्णने केली गेली त्या माहितीचे **वर्गीकरण आणि विश्लेषण** करण्यात आले. आणि भूगोल आणि मानवी भूगोलाचे स्वरूप वर्गीकरणात्मक झाल्याचे दिसते. विविध प्रवास वर्णने आणि **ग्रंथ संपदेमध्ये मानवाचे स्थलकालसापेक्ष वर्णन आढळते** या संकलित माहितीचे वर्गीकरण केल्यानंतर **पृथ्वीच्या पृष्ठभागावरील मानवाचे व्यवसाय, वंश, धर्म, संस्कृती, चालीरिती, रूढी परंपरा, शेती करण्याची पध्दती, आहार विहार इ घटकासंबधी माहिती मिळते.** या सर्व घटकांमध्ये स्थलकालसापेक्ष बदल आढळून येतो. उदा. मानवी वंशाचे वर्गीकरण करत असताना जगाच्या पाठीवर विविध वंशाचे लोक कशा प्रकारे विखुरलेले आहेत या संदर्भात अध्ययन करत असताना भूगोलकारांनी केलेल्या वर्णनांच्या अधारेच वर्गीकरण करण्यात आलेले आहे. तसेच **संकलित माहितीचे वर्गीकरण केल्यामुळे मानवी जीवनाविषयी समानता आणि विविध समजण्यास मदत झाली.** त्यामुळे मानवी भूगोलाचे स्वरूप वर्गीकरणात्मक आहे असे म्हणावे लागते.

### ३. आंतरविद्याशाखीय स्वरूप

आधुनिक काळामध्ये कोणत्याही विषयाचा अभ्यास करत असताना एकांगी करता येत नाही. भूगोल आणि मानवी भूगोलाचा अभ्यास **भाषाशास्त्र, गणित, भूमिती, संख्याशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भौतिकशास्त्र, जैवविज्ञान, रसायनविज्ञान, भूगर्भशास्त्र** यासारख्या अनेक विद्याशाखातील ज्ञानाच्या अधाराशिवाय पूर्णत्वाला जात नाही. मानवी भूगोल हा मानवी वर्तनाचा अभ्यास करत असतो. मानवाचे **वर्तन हे स्थलकालसापेक्ष असते, त्यामध्ये मोठया प्रमाणात प्रादेशिक भिन्नता आढळून येते.** मानवाच्या कोणत्याही कृतीचा अभ्यास करत असताना आपणास विविध विषयांचा आधार घ्यावा लागतो. उदा. मानवाच्या आर्थिक व्यवसायांचे विश्लेषण करत असताना अर्थशास्त्राचा अधार घ्यावा लागतो. लोकसंख्या तीचे प्रादेशिक वितरण, घनता, जन्मदर, मृत्यूदर आणि इतर लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा अभ्यास करत असताना संख्याशास्त्राच्या आधाराशिवाय हा अभ्यास करणे केवळ अशक्य असते. मानवी संस्कृती, भाषा आदी घटक समजावून घेत असताना अनेक भाषांविषयांचा आधार आवश्यक असतो. थोडक्यात **मानवी वर्तनातील प्रत्येक घटक इतर विद्याशाखांच्या अभ्यासाशिवाय पूर्णत्वाला जात नाही.** अनेक विद्याशाखांच्या ज्ञानाच्या अधारेच मानवी भूगोलतील ज्ञानाला चालना मिळत असते. मानवी भूगोलाचा अभ्यास हा इतर विद्याशाखांच्या मदतीशिवाय अपूर्ण ठरतो त्यामुळे या विषयांचे स्वरूप आंतरविद्याशाखीय आहे.

४. **निसर्गवादी स्वरूप**

मानवी ही निसर्गाची उपज आहे. निसर्गाच्या **किंवा पर्यावरणाच्या अनुकूलतेशिवाय मानव आपली प्रगती करू शकत नाही.** मानव हा निसर्गाचा गुलाम आहे. **मानवी जीवन हे पूर्णपणे निसर्गावर निर्भर आहे**. अशा आशयाचे विचार अनेक भूगोल तज्ञांनी मांडलेले आहेत. निसर्गवादी किंवा पर्यावरणवादी विचारसरणी १९ व्या शतकात विकसीत झाली असली तरी अगदी प्राचीन काळी देखील अनेक तज्ञांनी मानवी जीवन निसर्गावर अवलंबून आहे असे सांगितलेले आहे. इ.स.पू. पाचव्या शतकात **हिपोक्रॅटस** यांनी मानवी जीवन नैसर्गिक घटकांवरच अवलंबून आहे असे प्रतिपादन केले होते. पर्वतीय प्रदेशातील मानव उंच, धिप्पाड तर सपाट प्रदेशातील मानव बुटके आळशी असतातन असे त्यांनी सांगितले. नंतरच्या काळात निसर्गवादी विचारांमये **स्टॅब्रो, रिटर, हंम्बोल्ट, रॅटझेल, बकल, एडमंड डेमॉलिश, लेप्ले, कु एलन सेंपल** या विचारवतांनी त्यामध्ये भर घातली. निसर्गाच्या अनुकूलतेशिवाय मानव आपली प्रगती करूच शकत नाही. आधुनिक काळातमध्ये मानवाने भौतिकदृष्टया कितीही प्रगती केली असली तरी विविध प्रकारच्या नैसर्गिक समस्यांवर कशाप्रकारे मात करावी याविषयी मानवाला ज्ञान नाही. उदा. भारतातील संपूर्ण **अर्थव्यवस्था ही मोसमी पर्जन्यावर** अधारीत आहे. पर्जन्य निर्मिती ही मानवाच्या हाती नाही त्यामुळे निसर्गातील अशा कितीतरी बाबी ज्या संदर्भात मानव अनभिज्ञ आहे. नैसर्गिक अनुकूलतेशिवाय मानवी जीवन सुकर होऊच शकत नाही. आजही मानवी कृतींमुळे निसर्गाचा बिघडलेला समतोल पूर्ववत करण्यासाठी निसर्ग आपणहून

प्रयत्न करतच असतो. त्यामुळे **मानवी जीवन निसर्गाच्या अधिन आहे.** मानवाच्या प्रत्येक कृतीचा अभ्यास नैसर्गिक घटकांना अनुसरून केला जातो. मानवी भूगोलाच्या अभ्यासातून पर्यावरणीय समतोल साधला जावा म्हणून अलीकडील काळात अनेक विचारप्रवाह विकसीत होऊ लागले आहेत. शाश्वत विकासासाठी अनेक उपाययोजना मानवी भूगोलातून सुचविल्या जातात. म्हणून मानवी भूगोलाचे स्वरूप निसर्गवादी आहे असे म्हणावे लागते.

**५. मानवतावादी स्वरूप**

**मानवी प्रयत्नामुळे निसर्गाची बंधने खूपच शिथिल होऊन जीवन सुसह्य होऊ शकते**. निसर्गात अनेक सुप्त घटक आहेत. त्यांचा योग्य प्रकारे अभ्यास करून आपल्या अग्रक्रमानुसार विकास घडविणे हे सर्वस्वी **मानवी प्रयत्नावर अवलंबून असते अशी मतप्रणाली म्हणजे शक्यतावाद किंवा मानवतावादी** मतप्रणाली होय. वारे, नद्या, हिमनद्या याप्रमाणे मानव हा भूपृष्ठावर प्रचंड वेगाने बदल घडवून आणणारा घटक आहे. इतर घटकांपेक्षा मानवी क्रिया—प्रक्रियांमुळे फार वेगाने भूपृष्ठावर बदल घडून येत असतो. आदिमानवाने पृथ्वीवर बदल घडवून आणण्यास सुरूवात केली. अंतराळ— युगातील मानवाने प्रचंड वेगाने हा बदल चालू ठेवलेला आहे. **मानव निसर्गाच्या सहकार्याने त्याच्याबरोबर जोडीने काम करतो.** पृथ्वीवरील उंचसखलपणा व त्यामुळे आढळणारा गुरूत्वशक्तीतील फरक यांचा वापर मानवाने जलविद्युतनिर्मितीसाठी केला. डोंगरउतारावरील जमीन काही ठिकाणी चहा, कॉफीच्या मळ्यांसाठी वापरली. अशी अनेक उदाहरणे मानव—निसर्ग यांच्या सहकार्याच्या संदर्भात देता येतील. **मानवी विकासाला निसर्ग बंधनकारक नाही.** मानवाने आधुनिक तंत्र वापरून वनस्पति—पिकांच्या अनेक संकरीत जाती निर्माण केलेल्या. काचगृहातील शेतीचे तंत्र सैबेरियासारख्या अतिशीत प्रदेशात वापरून तेथेही गहू, सफरचंद यांसारखी पिके घेतली आहेत. **नैसर्गिक परिस्थिती मानवाला अनेक ठिकाणी संधी उपलब्ध करून देते**. परंतु तिचा फायदा कसा करून घ्यायचा किंवा कोणत्या नैसर्गिक परिस्थितीच्या घटकांची निवड आपल्या आर्थिक लाभासाठी करायची हे ठरविणे संपूर्णपणे मानवाच्या हातात असते. **नैसर्गिक परिस्थिती संपूर्णपणे मानवी समाजाचे स्वरूप नियंत्रित करू शकत नाही** तर त्यांस सशर्त विकास घडवून आणते. निसर्गाची पकड ढिली करणे हे मानवाच्या हाती असते. मानवी भूगोल हे निसर्ग व मानव यांमधील तडजोड करण्याचे शास्त्र आहे. मानवी भूगोलाच्या अभ्यासामुळे आपणास जगाच्या पाठीवर मानवी वस्ती विकासासाठी वाव असलेले प्रदेश, मानवीचे आर्थिक व्यवसाय उन्नतीचे ठिकाणे आदी बाबींची कल्पना येण्यास मदत होते. मानवी भूगोल हे शास्त्र नेहमी मानवी कल्याणाचाच विचार करत असते त्यामुळे मानवी विकास हाच मानवी भूगोलाचा अभ्यास विषय आहे. त्यामुळे मानवी भूगोलाचे स्वरूप हे मानवतावादी आहे असे म्हणावे लागते.

**६. एकसंध स्वरूप**

मानवी भूगोलामध्ये पृथ्वी आणि मानव यांच्या आंतरक्रियांचा अभ्यास केला जातो. पृथ्वीच्या पृष्ठभागावर मानवाचे जीवन सर्वत्र सारखे नाही. मानवाच्या विविध क्रिया स्थानिक परिस्थितीला अनुसरून असतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावर घटनाऱ्या अनेक **नैसर्गिक घटनांचा दृश्य अदृश्य परिणाम मानवाच्या जीवनावर होत असतो.** विविध प्रकारच्या भूरूपकीय हालचाली, वातावरणीय बदल यांचा परिणाम मानवी जीवनावर तात्काळ होत असतो. मानवी वर्तनाचा अभ्यास करत असताना भौतीक बाबी आणि मानवनिर्मिती बाबी यांचा एकत्रित अभ्यास करावा लागतो. एखादया नैसर्गिक घटनेचा मानवावर निश्चित काय परिणाम होऊ शकतो याच्या अभ्यासासाठी नैसर्गिक घटकांचा मानवी दृष्टीकोनातून अभ्यास करावा लागतो. त्यामुळे नैसर्गिक घटनानांना मानवाचा प्रतिसाद कशाप्रकारे याचा सखोल अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो. **भौगोलिक घटना आणि मानवी प्रतिसाद यांचा संयुक्तीक अभ्यास मानवी भूगोल करते म्हणून मानवी भूगोलाचे स्वरूप एकसंध किंवा एकात्मिक आहे.**

**७. शास्त्रीय स्वरूप/वैज्ञानिक स्वरूप:**

भूगोलशास्त्रातील विविध घटक विज्ञानाच्या कसोटयावर तपासून पाहता येतात. तद्वतच मानवी भूगोलाचा अभ्यास करत असताना मानवाचे वर्तन हे निसर्गातील घटकांना अनुसरून असते आणि ते पृथ्वीच्या पृष्ठभागावर सर्वत्र सारखेच असते. मानवी वर्तनाचा अभ्यास करत असताना विविध प्रासंगिक घटनांना मानवाचा प्रतिसाद भिन्न भिन्न असतो असा निष्कर्ष मनोविज्ञान सांगते. परंतू **नैसर्गिक घटनांना मानवाचा प्रतिसाद हा सर्वव्यापी आणि समान असतो.** उदा. पर्वतीय प्रदेशातील शेती ही जगाच्या पाठीवर सर्वत्र सारखीच असते. हवामानानुसार पिकरचनेत जरी बदल होत असला तरी शेती करण्याच्या पध्दती, वाहतूकीच्या सुविधा यामध्ये सारखेपणा आढळतो. मानवी विकासाच्या प्रगतीमध्ये भौतीक सुविधां कमी अधिक असू शकतात **परंतू भौतीक सुविधा बदलाचे टप्पे मात्र सर्वत्र सारखेच असतात.** विशिष्ट टप्प्यांनेच मानवी घटकांचा विकास होत असतो. उदा. लोकसंख्येचे होणारे संक्रमण, मानवीच्या राहणीमानातील बदल, आरोग्याच्या सुविधा अशा कितीतरी बाबी सांगता येतील ज्या बाबींचे विज्ञानातील **निरीक्षण, संकलन, वर्गीकरण, परिशीलन, कार्यकारणभावात्मक परिकल्पना, निष्कर्ष,** या विविध कसोटयांवर तपासून पाहिले असता मानवी भूगोलातील अभ्यास घटक तंतोतंत खरे ठरतात. मानवाने निसर्गातील विविध घटकांना दिलेल्या प्रतिसादाला एक विशिष्ट कार्यकारणभाव असतो विज्ञानातील सर्व कसोटयांवर याबाबी तपासून पाहता येतात. म्हणून भूगोलाचे स्वरूप जसे विज्ञानाधिष्ठीत आहे तसे मानवी भूगोलाचे स्वरूप देखील वैज्ञानिक आहे. अनेक निसर्गवादी तज्ञ मानवी भूगोलाच्या शास्त्रीय स्वरूपावर आक्षेप नोंदवितात परंतू मानवी

वर्तनाच्या अभ्यासाला जितके शास्त्रीय अधिष्ठान मानसशास्त्रामध्ये आहे. तितकेच शास्त्रीय अधिष्ठान मानवी भूगोलास देखील आहे.

**८. गतीशिल स्वरूप**

प्राचीन काळात केला जाणार भौगोलिक घटकांचा अभ्यास काळानुरूप बदलत गेल्याचे दिसते. भूगोल अभ्यासाचे स्वरूप १९५० नंतर व्यापक होऊन प्राकृतिक भूगोल आणि मानवी भूगोल या दोन स्वतंत्र विद्याशाखा अस्तित्वात आल्या. **काळानुरूप बदलत जाणाऱ्या अभ्यास पध्दतींचा अंगीकार मानवी भूगोलाच्या अभ्यासामध्ये सहज स्विकारला गेला.** आजमितीस अनेक नवनवीन विद्याशाखांद्वारे भूगोल आणि मानवी भूगोलातील घटकांचा अभ्यास केला जातो. त्यामुळे या विषयाचे स्वरूप गतीशिल आहे. अनेक विद्याशाखांमध्ये मोठया प्रमाणात तांत्रिक प्रगती झाली आहे. त्या प्रकारच्या तांत्रिक घटकांच्या अभ्यासातून मानवी भूगोलाचा केला जाणारा अभ्यास अधिक गतीमान झालेला आहे. मानवाच्या विविध कृतींचा अभ्यास ज्या मानवी भूगोलामध्ये केला जातो. त्या **प्रत्येक कृतीच्या अभ्यासासाठी मानवी भूगोलामध्ये विविध विद्याशाखा प्रचलित झाल्या आहेत.** या विविधि विद्याशाखांच्याद्वारे समर्पकपणे मानवी घटकांचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो आहे. मानवी क्रियांममुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांचा देखील मानवी भूगोलामध्ये अभ्यास केला जातो. हा सर्व अभ्यास करत असताना अलीकडील काळात विकसीत झालेल्या तांत्रिक घटकांची त्याला जोड दिली जाते. उदा – आजमितीस आपणास लोकसंख्येच्या वैशिष्टयांचा अभ्यास करावयाचा असल्यास तो संगणकाच्या साहयाने कमीतकती वेळात करून निष्कर्षापर्यंत येता येते. त्यामुळे मानवी भूगोलाचे स्वरूप गतीमान आहे असे म्हणावे लागते.

**९. आधुनिक स्वरूप**

आधुनिक काळामध्ये भूगोलशस्त्राच्या अभ्यासाचे स्वरूप पूर्णत पालटल्याचे दिसते. आधुनिक काळातील **विज्ञान आणि तंत्रज्ञानातील** झालेली प्रगती, विविध प्रकारच्या अभ्यासपध्दती यामुळे भूगोल आणि मानवी भूगोलाच्या अभ्यासामध्ये अमूलाग्र बदल झाल्याचे दिसते. आधुनिक काळाती **सुदूरसंवेदन प्रणाली, भौगोलिक माहिती प्रणाली, नकाशाशास्त्रात** झालेली प्रगती, संगणकाचा प्रभावी वापर यामुळे मानवी भूगोलाच्या अभ्यासाला वेगळे महत्व प्राप्त झाले आहे. आजमितीस भूगोलाचा अभ्यास ८० पेक्षा अधिक विद्याशाखांद्वारे आधुनिक प्रणालींचा उपयोग करून केला जातो आहे. उदा. एखादया प्रदेशातील भूमीउपयोजना संदर्भात माहितीचे संकलन आणि पृथ्थकरण करण्यासाठी सुदूर संवेदन प्रणालीचा उपयोग केला जात आहे. या प्रणालीद्वारे मिळणारे **निष्कर्ष हे अतिशय विश्वासदर्शक** असतात. आजमितीस विविध प्रकारच्या मानवी घटकांच्या नियोजनासाठी उपयोगात आणले जाणारे नकाशाशास्त्र आधुनिक बनले आहे. उदा. पर्जन्याचे प्रमाण अतिरिक्त झाल्यास किंवा कमी झाल्यास दुष्काळ शासकीय पातळीवर दुष्काळ जाहीर केला जातो.

पूर्वी दुष्काळ जाहीर करताना जिल्हानिहाय प्रकटन केले जात असे. आता तालुका पातळीपासून गावपातळीपर्यंत सुक्ष्म विश्लेषण करून यांत्रिक पध्दतीने सुदूरसंवेदनाचा उपयोग करून मानवी ऋटी टाळल्या जाऊन निरपेक्षपणे ही क्रिया केली जाते. या सारख्या असंख्या बाबतीत आधुनिक प्रणालींचा उपयोग केला जात आहे. त्यामुळे मानव भूगोलाचे स्वरूप आधुनिक बनलेले आहे. भूगोल अभ्यासक मानवी भूगोलाचे प्रचारक आणि प्रसारक असल्याने मानवी भूगोलामध्ये आधुनिक प्रणालींचा स्विकार अतिशय झटपट होत असल्याचेही दिसून येत आहे.

## मानवी भूगोलाची व्याप्ती (Scope of Human Geography)

मानवी भूगोल हा अतिशय व्यापक विषय आहे. ज्याप्रमाणे भूगोलामध्ये निसर्ग आणि मानवनिर्मित **अनेक मूर्त व अमूर्त घटनांचे परीक्षण** केले जाते. त्याप्रमाणे मानवी भूगोलामध्ये **मानवी वर्तन, मानवी समाज, लोकसंख्या, मानवाच्या आर्थिक आणि सामाजिक क्रिया व त्यांचे निवासस्थान** यावर मानवी भूगोलाच्या अभ्यासात प्रामुख्याने भर दिला जातो. जगातील विविध पर्यावरणात मानवी जीवन भिन्न भिन्न स्वरूपाचे आहे. मानवाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनप्रणाली आणि त्यासंबधी घटकांमध्ये जागतीक पातळीवर प्रचंड विविधता आढळून येते. मानवी समाजाच्या अभिक्षेत्रीय वितरणाचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो. अलीकडील काळात मानवी भूगोलाचे अभ्यास क्षेत्र विस्तृत होत असून त्याची व्याप्ती प्रचंड वाढत आहे. मानवी भूगोलाच्या व्याप्तीचा थोडक्यात सारांश पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १. मानवी उत्क्रांती

मानवी भूगोलाच्या अभ्यासाचा **केंद्रबिंदू मानव** हा आहे. मानवाच्या उत्क्रांती पासून विविध घटकांमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो. इतर सजीवांप्रमाणेच पृथ्वीच्या पृष्ठभागावर मानवाची निर्मिती झाली. मानवाची निर्मिती होत असताना **उत्क्रांतीच्या विविध अवस्थांचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो**. नरवानर वर्गातील आता अस्तित्वात नसलेल्या पूर्वजांपासून आधुनिक मानवाची उत्क्रांती झाली असे मानले जाते. मानवाच्या उत्क्रांतीच्या या **दीर्घ प्रक्रियेला सु. ६० लाख वर्षांचा कालावधी लागलेला आहे.** दोन पायांवर उभे राहून चालणे हे मानवाचे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण मानले जाते आणि सु. ४० लाख वर्षांपूर्वी मानवामध्ये हे लक्षण उत्क्रांत झाले. त्यानंतर, आकारमानाने व गुंतागुंतीची संरचना असलेला मेंदू, अवजारांची निर्मिती व वापर, भाषेची क्षमता इ. इतर मानवी वैशिष्ट्ये विकसित झाली. **सांकेतिक अभिव्यक्ती, कला आणि सांस्कृतिक विविधता इ. प्रगत वैशिष्ट्ये मागील एक**

**लाख वर्षांत विकसित झालेली आहेत.** लाखो वर्षापूर्वीचे सापडलेले मानवसदृश्य जीवाश्मांच्या आधारे मानवाच्या उत्क्रांतीचे विविध टप्पे करण्यात आलेले आहेत. **आदिमानवाच्या १५ ते २० जाती असाव्यात** असे अनेक वैज्ञानिकांनी मान्य केले आहे. काळाच्या ओघात उत्क्रांती अवस्थेत अनेक जाती लुप्त झाल्या. आणि आधुनिक **होमो** प्रजातीचा विकास झाला होमो प्रजातीच्या **होमो हॅबिलीस, ऑस्ट्रॅलोपिथेकस, होमो इरेक्टस, होमो हायडेलबर्गेन्सिस, होमो फ्लोरेसिन्सिस, होमो निअँडरथलेन्सिस आणि होमो सेपिएन्स** अशा विविध प्रजाती मानल्या जातात. या सर्वांचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो.

## २. मानवी वंश

मानवी वंशाचा अभ्यास मानवी भूगोलमध्ये केला जातो. वांशीक वर्गीकरणावर भौगोलिक घटकांचा सर्वाधिक परिणाम होत असतो. **सद्य स्थितीत अस्तित्वात असलेले सर्व मानव एका मोठया होमो प्रजातीचेच घटक आहेत.** जननिक तत्वे आणि बाहय लक्षणांच्या अधारे आजमितीस आपण अनेक लहान लहान गटांमध्ये मानवाचे वर्गीकरण करत असतो. या लहान लहान गटांना आपण वंश असे म्हणतो. वांशिक लक्षणे दृश्य आणि अदृश्य स्वरूपाची असतात. सर्वसाधारणपणे दिसणाऱ्या लक्षणांमध्ये **कातडीचा रंग, प्रकार, चेहऱ्याचा आकार आणि ठेवण, केसरचना, ओठांचा आकार, नाकाची रचना आणि आकार, मानवाची उंची** या घटकांचा समावेश होतो. मानवाच्या या भौतिक लक्षणांवर भौगोलिक घटकांचा सर्वाधिक परिणाम होतो. मानवी वंशाचे **कॉकेसाईड, निग्रॉईड आणि मंगोलाईड** या प्रमुख तीन गटात वर्गीकरण केले जाते. या पैकी **कॉकेसाईड लोक गोरे** असतात. **मंगोलाईड पिवळया** वर्णाचे असतात तर **निग्रो लोक काळया** रंगाचे असतात. मानवाच्या कातडीचा रग आणि सभोवतालचे पर्यावरण याचा प्रत्यक्ष संबंध दिसून येतो. उष्ण कटीबंधीय प्रदेशात जेथे उष्णतेचे प्रमाण अधिक आहे तेथील लोकांचा वर्ण हा काळा आढळतो. तर शित हवामानाच्या प्रदेशातील लोकांचा वर्ण गोरा आढळतो. तर समशितोष्ण प्रदेशात राहणारे मंगोल वंशाचे लोक पिवळया वर्णाचे आढळतात. कातडीच्या रंगासारखी अनेक वांशिक लक्षणावर भौगोलिक घटकांचा परिणाम होत असतो. अलीकडील काळात वांशिक संक्रमण मोठया प्रमाणात घडून आले असले तरी वंशाची मुळ लक्षणे मानवामध्ये अस्तित्वात असतात. मानवी भूगोलामध्ये मानवी वंशाचा सविस्तर अभ्यास केला जातो.

## ३. धर्म आणि जात

मानवाची आपली **जीवन जगण्याची विशिष्ट शैली म्हणजेच धर्म होय.** विशिष्ठ आचार प्रणालीची धारणा करतात. सामाजिक नितिनियमांचे पालन करतात अशा लोकांचा समूह म्हणजेच धर्म होय. प्रत्येक धर्माची विशिष्ट **व्रत, वैकल्य, कर्मकांड, उपासना, प्रार्थना, आणि धार्मिक संकेत** ठरलेले असतात. धर्म ही जरी एक अमूर्त, अद्वितीय आणि व्यक्तीला ईश्वरापर्यंत नेणारी संकल्पना असली तरी, मानवाच्या धार्मिक नितीनियमांना, संस्कारांना आणि पालन केल्या जाणाऱ्या अधिनियमानां नैसर्गिक नियम कारणीभूत असतात.

**विशिष्ठ प्रदेशात विशिष्ठ धर्माचे लोक मोठया प्रमाणात राहत असतात.** धार्मिक घटकांवर नैसर्गिक आणि प्रादेशिक घटकांचा परिणाम होत असतो. प्रत्येक धर्मामध्ये पाळले जाणारे संस्कार सार्वत्रिक असले तरी ते पार पाडत असताना केले जाणारे विधीनिषेध प्रादेशिक बदलानुसार बदलत जातात. उदा. हिंदू धर्मातील पाळण्यात येणारे सोळा संस्कार पार पाडत असताना त्यामध्ये तेथील पर्यावरणीय परिस्थितीचा परिणाम झाल्याचे दिसते. सण, उत्सव, रूढी, परंपरा यावर देखील भौगोलिक घटकांचा परिणाम होत असतो. त्यामुळे **धार्मिक आणि जातीय घटकांवर देखील नैसर्गिक घटकांचा परिणाम होतो** याचा सविस्तर अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो.

**४. भाषा आणि भाषा समूह**

भाषा ही मानवी समाजाला मिळालेली एक महत्त्वाची देणगी आहे. मानवी उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये मानवाच्या **कंठमणीत विकसीत झालेल्या स्वरयंत्राच्या साहयाने काही मौखीक ध्वनी** निर्माण करता येऊ लागले. ध्वनीयंत्राच्या कंपनातून निर्माण झालेल्या अशा मौखीक ध्वनींचे रूपांतर काही काळानंतर वर्णात करण्याची नैसर्गिक युक्ती मानवाला प्राप्त झाली. विविध **मौखिक ध्वनींच्या समुच्चयाने माणसाला भाषा** अवगत झाली आणि अशा भाषेचा उपयोग तो आपल्या मनातील विचार भाव भावना दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहेचऊ शकताला. आज ज्या भाषा विविध देशांतील मानवी समाज दैनंदिन जीवनात वापरतांना दिसतात त्या भाषांची निर्मिती व वृध्दी याच प्रकारे झालेली आहे. भाषा ही एका व्यक्ती समुदायाने आपापसात संदेश व्यक्त करण्यासाठी व ग्रहण करण्यासाठी निर्माण केलेले साधन आहे. भाषेची व्याख्या करताना आपणास असे म्हणतात येते '' **भाषा म्हणजे एका मनुष्य समुदायाने आपले विचार, भाव भावना व्यक्त करण्यासाठी केलेले साधन किंवा पध्दती होय.''** भाषेच्या विकासावर विविध घटकांचा परिणाम झाल्याचे दिसते. काळाच्या ओघात अनेक भाषा लुप्तही झाल्या आहेत किंवा त्यांचा वापर अतिशय मर्यादीत होत आहे. उदा. संस्कृत, लॅटीन, ग्रीक. **भाषांचा विकास, भाषा, बोली, भाषा समूह, भाषा कुटूंब या भाषेसंदर्भातील विविध घटकांचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो.** अलीकडी संधोधनामध्ये भाषेवर भौगोलिक घटकांचा प्रत्यक्ष प्रभाव होत असल्याचेही सिध्द झालेले आहे. नैसर्गिक पर्यावरणानुसार विविध भाषा बोलण्याच्या पध्दतीवर त्याचा परिणाम होत असतो. भाषेतील स्वर आणि व्यजंनावर नैसर्गिक पर्यावरणाचा परिणाम होतो हे अमेरिकेतील मियामी विद्यापीठातील भाषातज्ञ **'काबेल एवरेट'** यांनी सिध्द केले त्यांनी जगातील विविध खंडातील ६०० भाषेंचा अभ्यास केला. व असा निष्कर्ष काढला की, जगातील सहा **अधिक उंचीच्या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये ९२ विशेष व्यजंनाचा उपयोग केला जातो.** अधिक उंचीच्या प्रदेशात लोक श्वासोश्वास अधिक वेगाने करत असल्याने भाषेवर त्याचा प्रभा होतो. तसेच शित प्रदेशातील लोकांच्या भाषेवरही तेथील

तापमानाचा परिणाम होत असतो. भाषेसंदर्भात प्रादेशिक वितरणासह विविध घटकांचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो.

### ५. पर्यावरण आणि मानवी जीवनाचा सहसंबध

मानवी भूगोलाच्या अभ्यासामध्ये **सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण** आणि मानव यांच्या सहसंबधांच्या अभ्यासाला अतिशय महत्त्व आहे. पर्यावरण या संकल्पनेमध्ये **सजीव व निर्जीव घटक, मानव, मानवाचे वर्तन, भौतीक वातावरण आणि नैसर्गिक परिस्थिती** यासारख्या घटकांचा विचार केला जातो. **मानवी जीवनाच्या जडणघडणीत नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव पडत असतो.** मानवाच्या वर्तन व व्यवहारातून मानवी पर्यावरण निर्माण होत असते. पर्यावरण आणि मानवी संस्कृती यांचा परस्पर संबंध असतो. मानवी संस्कृती ही सभोवतालच्या परिस्थितीनुसार घडत असते. पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासामध्ये कोणत्याही प्रदेशातील **नैसर्गिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक** इत्यादी घटकांचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला जातो. निसर्ग आणि मानव यांचे अतूट नाते आहे. निसर्गातील घडामोडींमुळे समग्र मानवी जीवन प्रभावित होत असते. **मानवाची जीवन जगण्याची एक विशिष्ट शैली असते, ही शैली नैसर्गिक परिस्थितीनुसार तयार होत असते.** पृथ्वीच्या पृष्ठभागावरील विविध प्रकारच्या पर्यावरणामध्ये विविध संस्कृती विकसित झालेल्या दिसून येतात. नैसर्गिक पर्यावरणाचा प्रत्यक्ष परिणाम मानवी जीवनावर होत असतो उदा. उष्णकटिबंधात राहणारे लोक रंगाने काळे असतात, तर शित कटीबंधात राहणारे लोक श्वेतवर्णीय असतात. याशिवाय मानवाचे सर्व आर्थिक व्यवसाय हे पर्यावरणाशी निगडित असतात. ज्याप्रमाणे नैसर्गिक पर्यावरणाचा परिणाम मानवी जीवनावर होतो, त्याचप्रमाणे **मानवाच्या वर्तन आणि व्यवहाराचा परिणाम नैसर्गिक पर्यावरणावर देखील होत असतो.** अलीकडील काळात बदलत्या पर्यावरणीय परिस्थितीला मानव हा बहुतांशी कारणीभूत आहे. त्यामुळे मानव आणि पर्यावरण यांचे नाते अतूट असून त्यांच्यामध्ये परस्पर संबंध असतो

### ६. मानवी वस्त्या

**अन्न वस्त्र आणि निवारा** या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. या सर्व गरजांची पूर्ती निसर्गातूनच होत असते. प्रारंभिक अवस्थेमध्ये मानव निवाऱ्यासाठी गुहेत राहत असे. आधुनिक काळामध्ये मानवाच्या निवासस्थानामध्ये प्रचंड विविधता आलेली आहे. त्यामुळे **वस्तीचे प्रारूप आणि आकारमान** यामध्ये देखील बदल झालेला आहे. ग्रामीण भागातील वस्त्यांवर आजही ही नैसर्गिक पर्यावरणाचा, आर्थिक घटक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा प्रभाव जाणवतो. परंतू सर्वाधिक प्रभाव नैसर्गिक पर्यावरणाचाच होत असतो. **घरांचे बांधकाम, रचना, भिंती, छप्पर, घरांना असणारी तावदाने या सर्व घटकांवर नैसर्गिक पर्यावरणाचा परिणाम होत असतो.** स्थानिक प्रदेशात मिळणाऱ्या बांधकामयोग्य वस्तू गोळा करून मानव

आपले घर बांधत असतो. उदा. कोकणातील लोक घरांच्या भिंतीसाठी जांभ्या खडकांच्या चिऱ्यांचा वापर करतात. घाटमाथ्यावरील लोक बेसॉल्ट या काळया दगडांचा वापर करतात. तर उत्तर भारतीय महामैदानातील लोक घरांच्या बांधकामासाठी मातीपासून बनविलेल्या विटांचा वापर करतात. जास्त पाऊस पडणाऱ्या प्रदेशात **उतरत्या छपराची** घरे असतात, तर कमी पर्जन्य पडणाऱ्या प्रदेशात **धाब्याची** (सपाट छप्पराची मातीचा गिलावा केलेली) घरे असतात. जास्त उष्णता असणाऱ्या वाळवंटी प्रदेशात घरांच्या **भिंतींची रुंदी अधिक** असते, तर घरांना अतिशय **लहान—लहान खिडक्या** असतात. नैसर्गिक पर्यावरणाचा हा परिणाम संपूर्ण जगामध्ये घर बांधण्याच्या पद्धतींवर झालेला दिसतो. मैदानी प्रदेशात पूरस्थिती निर्माण होणाऱ्या नद्यांच्या **खोऱ्यात घरे उंचवट्यावर बांधलेली** असतात. कमी पर्जन्य किंवा हंगामी पर्जन्याच्या प्रदेशात घरे नद्यांच्या, तळयाच्या, सरोवरांच्या काठावरबांधलेली असतात. वाळवंटी प्रदेशात पाणवठ्यजवळ घरे बांधली जातात. नागरी वसाहतींच्या संदर्भात पर्यावरणाचा परिणाम हा अल्प असला तरी भौगोलिक घटकांचा परिणाम नागरी वसाहतींवर देखील होत असतो. त्यामुळे मानवाचे वस्तीस्थान हे भौगोलिक घटकांचा प्रभाव असलेले क्षेत्र आहे. मानवाच्या निवासस्थानावर भौगोलीक घटकांचा कशाप्रकारे प्रभाव होत असतो या सर्व घटकांचा सविस्तर अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो.

७. **लोकसंख्याशास्त्रीय घटक**

लोकसंख्या हा मानवी भूगोलाचा अतिशय महत्त्वाचा अभ्यास घटक आहे. मानवी लोकसंख्या अभ्यासाच्या दृष्टिकोनातून **लोकसंख्या वाढ, लोकसंख्येची घनता, लोकसंख्येचे जागतिक वितरण, लोकसंख्येची रचना, लोकसंख्येची वैशिष्टये, स्थलांतर, धर्म, जात, लोकसंख्या विषयक धोरणे,** यांचा सविस्तर अभ्यास मानवी भूगोलात केला जातो. एखाद्या प्रदेशातील लोकसंख्येचे वितरण अभ्यासात असताना लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे भोगोलिक घटक, दाट व विरळ लोकवस्तीचे प्रदेश, मध्यम घनतेचे प्रदेश, पर्याप्त लोकसंख्या, नियंत्रण लोकसंख्या, व अतिरिक्त लोकसंख्या यांचादेखील अभ्यास केला जातो. लोकसंख्या वैशिष्ट्यंचा अभ्यास करत **असताना जनन, मर्तत्या, लिंगरचना, वयोगट रचना, साक्षरता, स्थलांतर, आणि व्यवसायिक रचना** या घटकांचा अभ्यास केला जातो. या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करत असताना त्याचे मोजमाप, वाढ किंवा घट होण्याची कारणे आणि परिणामासह अनेक बाबीचे विश्लेषण मानवी भूगोल करते. मानवी भूगोलाच्या अभ्यासामध्ये एखाद्या प्रदेशातील लोकसंख्या ही त्या प्रदेशातील साधन संपत्ती आहे किंवा नाही हे ठरवण्यासाठी विविध कसोटयांचा वापर केला जातो. लोकसंख्या नियंत्रणासाठी विविध प्रकारचे उपाय मानवी भूगोलाच्या माध्यमातून सुचविले जातात. **एखाद्या प्रदेशातील लोकसंख्या वाढ होण्यासाठी जन्मदर, मृत्युदर आणि स्थलांतर घटक कारणीभूत असतात.** जन्मदर आणि मृत्युदर यामधील फरकामुळे लोकसंख्येमध्ये नैसर्गिक बदल होत असतात याची सविस्तर

कारणमीमांसा लोकसंख्या अभ्यासातून केली जाते. **लोकसंख्या मापन करण्याच्या विविध पद्धती** आणि त्याचे महत्व हादेखील लोकसंख्या अभ्यासाचा महत्वाचा घटक आहे. लोकसंख्येच्या संदर्भातील अनेकाविध बाबींचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये सविस्तर केला जातो.

**८. आर्थिक क्रिया**

मानवाच्या आर्थिक क्रिया आणि व्यवसाय हादेखील मानवी भूगोलाचा एक महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. मानव आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध प्रकारचे व्यवसाय करतो या **व्यवसायांना मानवाच्या अर्थिक क्रिया असे म्हणतात.** मानवाच्या सर्व आर्थिक क्रिया प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या नैसर्गिक पर्यावरणावरच अवलंबून असतात. मानवाच्या व्यवसायांचे प्रमुख चार प्रकार पडतात. यामधील **प्राथमिक** स्वरूपाच्या व्यवसायात **शेती, वनसंकलन, लाकूडतोड, मासेमारी, खाणकाम, पशुपालन, कुकूटपालन, वराहपालन, वाळुकाम** यांचा समावेश होतो. मानवाचे हे सर्व प्राथमिक व्यवसाय पूर्णत: नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असतात. उदा. मानवाचा प्रमुख व्यवसाय शेती हा मृदा, पर्जन्य, हवामान यासारख्या नैसर्गिक घटकांवर अवलंबून असतो. नैसर्गिक घटकांची अनुकूलता ज्या प्रदेशात असेल तेथेच शेती हा व्यवसाय विकसित होतो. वास्तविक पाहता मानवाचे सर्व व्यवस्था हे नैसर्गिक परिस्थितीवरच अवलंबून असतात परंतु प्राथमिक व्यवसायाच्या संदर्भात असे  दिसून येते की, की प्राथमिक व्यवसाय हे पूर्णत: नैसर्गिक घटकांवर अवलंबून असतात. **द्वितीय क्षेत्रातील** व्यवस्थांमध्ये **कुटीर उद्योग, अवजड उद्योगधंदे, प्रक्रिया उद्योग, बांधकाम,** कृषी घटकांवर आधारित इतर उद्योग, कुटिर उद्योग, अवजड उद्योग, यांचा समावेश होतो. हे मानवाचे व्यवसाय प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या भौगोलिक घटकांवर अवलंबून असतात उदा. शेती किंवा खाणकाम क्षेत्रातून मिळणाऱ्या कच्च्या मालावर आधारित असणारे उद्योगधंदे हे कच्च्या मालाची उपलब्धता असणाऱ्या प्रदेशांमध्ये विकसित होत असतात. द्वितीय क्षेत्रातील उद्योग व्यवसायांच्या वाढीमुळे लोकसंख्येचे केंद्रीकरण होते आणि एखाद्या प्रदेशाचे नागरी भागात रुपांतर होते. नागरीकरण झालेल्या प्रदेशात झालेल्या लोकसंख्या वाढीमुळे लोकांना सेवा देण्यासाठी **तृतीय आणि चतुर्थ** श्रेणीतील व्यवसायांचा विकास होतो. तृतीय श्रेणीतील **सेवा व्यवसाय** हे पूर्णत: लोकसंख्येवर आधारित असणारे व्यवसाय आहेत. यामध्ये **सेवा, व्यापार, वाहतूक, पर्यटन, वैद्यकीय सेवा, विपणन, दळणवळण,** यासारख्या व्यवसायांचा समावेश होतो. तर लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी आणि सामाजिक परिवर्तनासाठी **चतुर्थ** श्रेणीतील **संशोधन आणि समाजसेवा** या सारख्या आर्थिक व्यवसायाचा विकास होत असतो. एखाद्या प्रदेशातील व्यवसाय विभाजन कशा प्रकारे होते किंवा त्यामध्ये टप्प्याटप्प्याने कशा प्रकारे वाढ होत जाते या सर्व घटकांचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो.

## ९. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन

मानवाचा सामाजिक आणि सांस्कृतिक विकास हा एक महत्त्वाचा पैलू आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक विकास आर्थिक विकासाशी निगडित असतो. मानवाच्या **रूढी, परंपरा, चालीरीती, उत्सव, आहार विहार, वेशभूषा, भाषा आणि संस्कृती** इत्यादींचा अभ्यास करत असताना तेथील पर्यावरणाचा होणारा विशेष प्रभाव याचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो. सामाजिक भूगोलाच्या अभ्यासात **कुटुंब, कुटुंब संस्था, समूह, समाज** यांचा अभ्यास करताना मानवी विकासाच्या अनुषंगाने **शिक्षण, आरोग्यसुविधा, आर्थिक दुर्बल घटकांचे सबलीकरण, सामाजिक विषमता, जात, वंश, धर्म आणि लिंग रचना** या घटकांना अनुसरून असणारी सामाजिक रचना यांचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो. एखाद्या देशातील लोकांना जागतिक वातावरणात टिकून राहण्यासाठी समर्थ सामाजिक संस्था, भक्कम कुटुंब व्यवस्था आणि बळकट समाजाची आवश्यकता असते. त्यामुळे मानव ही साधन संपत्ती मानून लोकांमधील गुंतवणुकीला काही देशांमध्ये सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. मानवाची संस्कृती ही महत्त्वाचा अभ्यास विषय आहे पर्यावरणीय परिस्थितीचा सांस्कृतिक घटकांवर प्रभाव होत असतो. काळाच्या ओघात अनेक संस्कृत्या लयास गेलेल्या आहेत तर काही संस्कृत्या भक्कमपणे टिकून आहेत. नैसर्गिक परिस्थितीशी ज्या संस्कृत्या जुळवून घेऊ शकल्या नाहीत अशाच संस्कृत्या लयास गेलेल्या आपण पाहतो. त्यामुळे आपली संस्कृती आणि तिची वैशिष्ट्ये टिकवून ठेवण्यासाठी नैसर्गिक पर्यावरणाला अनुसरून वर्तन करणे अपेक्षित आहे. या सारख्या बाबींची उकल मानवी भूगोलाच्या अभ्यासातूनच होते. त्यामुळे मानवी भूगोल सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा सविस्तर अभ्यास करून मानवाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनास एक दिशा देत असतो.

१. मानवी भूगोल अनेक मानवाच्या संदर्भातील **अनेकाविध भौगोलिक घटकांचा** अभ्यास करत असल्यामुळे मानवी भूगोलाची व्याप्ती प्रंचड आहे.
२. मानवी भूगोल ही अलीकडील काळात विकसीत झालेली भूगोलाची शाखा असली तरी, मानवाच्या **बहुआयामी कृतींमुळे मानवी भूगोलाची** व्याप्ती प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे.
३. विविध कालखंडातील विचारवंतानी त्यामध्ये मोठया प्रमाणात भर घातलेली आहे. मानवी भूगोलाची व्याप्ती वाढविण्यामध्ये भारतासह **ग्रीक, रोमन, अरब, जर्मन, फ्रेंच, ब्रिटीश, अमेरिकन** भूगोलतज्ञांचे कार्य महत्त्वाचे आहे.
४. जगाच्या विविध भागातील मानवी **लोकसंख्येची वाढ, वितरण, घनता, स्थलांतर, स्थलांतराचे प्रकार, मानवी समुदाय त्यांच्या आर्थिक क्रिया यांमधील प्राकृतिक व सांस्कृतिक फरक** यांच्या अभ्यासाचा समावेश मानवी भूगोलाच्या अभ्यासात होतो.

५. **मानव व त्यांचे नैसर्गिक पर्यावरण** यांच्या संबंधांचा व मानवाच्या विविध क्रियांच्या वितरणाचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो. विविध **संस्कृती, भाषा, धर्म, रुढी, परंपरा** इत्यादीचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो.

६. ग्रामीण वसाहतीचे प्रकार **आकृतीबंध, नागरी वस्तीचे स्थान, आकार, वाढ व कार्य ,कार्यानुसार नागरी वस्त्यांचे वर्गीकरण** यांचा अभ्यासही मानवी भूगोलात केला जातो.

७. मानवाच्या आर्थिक क्रियांच्या क्षेत्रीय वितरणाचा अभ्यास ही मानवी भूगोलात केला जातो. **उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक व दळणवळण** यावर होणाऱ्या नैसर्गिक परिस्थितीच्या परिणामाचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो.

८. एखाद्या प्रदेशातील नैसर्गिक परिस्थितीचा जो प्रभाव **आर्थिक क्रिया, समाज, संस्कृती, लोकांचा धर्म** यावर असतो त्याचा अभ्यास आपण मानवी भूगोलात करतो.

९. मानवाचा पर्यावरणावर जो परिणाम होत असतो त्यांच्या अभ्यासाचे महत्त्व आता मानवी भूगोलाच्या अभ्यासात वाढत आहे.

१०.**विषुववृत्तीय, उष्ण वाळवंटी, समशितोष्ण आणि टुंड्रा** अशा वैशिष्टपार्ण भौगोलिक प्रदेशात मानवांने प्राकृतिक पर्यावरणाशी केलेले समायोजनाचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो.

११.मानवी भूगोलाच्या अभ्यासामुळे विविध **सामाजिक गट व त्यांचे नैसर्गिक पर्यावरण यांच्या सहजीवनाचे आकलन** होण्यास त्यामुळे मदत होते.

१२.जगाच्या विविध प्रदेशातील **समाज, संस्कृती व मानवनिर्मित दृश्यातील विरोधाभास** व त्याचे स्पष्टीकरण मानवी भूगोलात मिळते.


१३.मानवी भूगोलाच्या अभ्यासामुळे नागरिकांत बहुश्रुतता निर्माण करण्यास मदत होते आपल्या समाजातील व नाना प्रदेशातील महत्त्वाच्या समस्यांचे आकलन व निराकरण करण्यास आपण अधिक सज्ज होतो. थोडक्यात **मानवी भूगोलाची व्याप्ती सर्वस्पर्शी आहे** या विषयाची व्याप्ती दिवसे दिवस वाढत असून त्याचे क्षेत्र विशाल बनले आहे.

*****************

## मानवी भूगोलाच्या शाखा (Branches of Human Geography)

मानवी भूगोल ही भूगोलाचे महत्त्वाची शाखा असून अठराव्या शतकापासून या शाखेच्या विकासाला सुरुवात झाली. अलीकडील काळात या विषयाची व्याप्ती झपाटयाने वाढू लागली आहे. या विषयावर **फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, अमेरिका, आणि रशिया** या देशांमध्ये विविध ग्रंथ लिहिले गेले आहेत. मानवा संबंधित विविध घटकांचा अभ्यास मानवी भूगोलामध्ये केला जातो. मानवी भूगोलाच्या अंतर्गत सामाजिक – सांस्कृतिक भूगोल आणि आर्थिक भूगोल या दोन महत्त्वाच्या उपशाखा विकसित झालेल्या आहेत.

### मानवी भूगोलाच्या विविध शाखा




मानवी समाजाचा विकास होत असताना मानवी भूगोलाच्या विविध उपशाखांच्या अभ्यासाद्वारे मानवाला आपल्या दैनंदिन गरजा व समस्या सोडवण्यासाठी तसेच त्याची तीव्रता कमी करण्यासाठी उपयोग होत आहे. विसाव्या शतकात अतिशय वेगाने मानवी भूगोल विकसित झाला मानवी कल्याणासाठी मानवी

भूगोलाचा अभ्यास विषय अतिशय महत्त्वाचा मानला जाऊ लागला आहे. विविध घटकांच्या संदर्भात मानव **आपले नियोजन आणि व्यवस्थापन करत असताना त्याला आर्थिक–सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांची माहिती व त्याचा भौगोलिक घटकांशी असणारा सहसंबंध या विविध मानवी भूगोलाच्या शाखा द्वारे माहिती होऊ लागला आहे.** मानवी भूगोल ही भूगोलाची अगदी नवोन्मुख शाखा असली तरी तरी आजमितीस विविध उपशाखांच्याद्वारे त्याचे ज्ञान उपयोगी होत आहे. मानवी भूगोलाच्या विविध शाखांची माहिती आपल्याला खालील प्रमाणे सांगता येईल.

## अ) आर्थिक भूगोल (Economic Geography)

आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची अतिशय महत्त्वाची शाखा आहे. मानवाच्या आर्थिक क्रियांचा आणि व्यवसायांचा पद्धतशीर अभ्यास मानवी भूगोलाच्या आर्थिक भूगोल या शाखेमध्ये केला जातो. ब्रिटिश भूगोल तज्ञ **जॉर्ज चिशोल्म** यांनी या विषयासाठी **'भू अर्थशास्त्र'** असा शब्द प्रयोग सर्वात प्रथम केला. त्यांनी मानवाच्या आर्थिक क्रियांवर भौगोलिक घटकांचा होणारा प्रभाव अतिशय सविस्तरपणे स्पष्ट केला आहे. त्यामुळे **जॉर्ज चिशोल्म** यांना आर्थिक भूगोलाचे जनक असे म्हणतात. **जॉर्ज चिशोल्म** यांनी आर्थिक भूगोलाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की **'वाणिज्य घटकांशी निगडित भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास म्हणजेच आर्थिक भूगोल होय.' 'पृथ्वीवरील विविध प्रदेशातील उत्पादन व्यापार व यांचा सविस्तर अभ्यास आर्थिक भूगोलामध्ये केला जातो'** असे हार्टशॉर्न व अलेक्झांडर यांनी म्हटले आहे. मानवाने आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी विविध व्यवसायांची निर्मिती केलेली आहे. हे सर्व व्यवसाय मानवाच्या आसपास असणाऱ्या भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात. मानवाच्या आर्थिक क्रियांचे स्वरूप, वितरण, आणि त्यांचा विकास याबद्दलचा अभ्यास मानवी भूगोल या विषयांमध्ये केला जातो. मानवाच्या विविध आर्थिक व्यवसायांमध्ये निसर्गावर आधारित असणारे प्राथमिक व्यवसाय, कच्चा मालावर आधारित व प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे नैसर्गिक घटकावर अवलंबून असलेले **द्वितीय क्षेत्रातील व्यवसाय, तृतीय क्षेत्रातील सेवा व्यवसाय आणि चतुर्थ श्रेणीतील बौद्धिक** संपदेवर आधारित इतर व्यवसाय, यासारख्या व्यवसायांचा समावेश होतो. मानवाच्या आर्थिक व्यवसायांची व्याप्ती खुपच मोठी असल्यामुळे मानवाच्या महत्त्वाच्या व्यवसायांचे सविस्तर व सखोल अध्ययन करण्यासाठी आर्थिक भूगोलाच्या इतर अनेक उपशाखा निर्माण झालेल्या आहेत. या सर्व उपशाखांचा विकास अगदी अलीकडच्या काळात म्हणजे १९६०च्या दशकानंतर झालेला आहे. आर्थिक भूगोलाच्या अभ्यासामुळे मानवाच्या सर्व आर्थिक व्यवसायांची माहिती आपणास मिळते. पर्यावरणातील प्रादेशिक भिन्नतेमुळे मानवाच्या आर्थिक व्यवसायातही विविधता आढळते. मानव सर्वप्रथम सभोवतालच्या पर्यावरणातून आपल्या अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा भागवण्यासाठी प्रयत्न करतो. परंतु भूपृष्टावरील साधनसंपत्तीच्या असमान वितरणामुळे तो राहतो त्या

प्रदेशातून त्यांच्या सर्व गरजा भागवल्या जातीलच असे नाही अशावेळी इतर प्रदेशातून वस्तूंची देवाण घेवाण करावी लागते म्हणूनच आर्थिक भूगोलात **साधन संपत्तीचे वितरण, वस्तूंचे उत्पादन, वितरण व उपभोग** यांचा प्रामुख्याने अभ्यास करण्यात येतो. त्याचप्रमाणे विविध व्यावसायांचे **वितरण, समस्या, आणि केंद्रीकरण यांच्यावर नैसर्गिक घटकांचा असणारा प्रभावही आपणास माहिती होतो.** एखाद्या प्रदेशांमध्ये एखादा उद्योग किंवा व्यवसाय विकसित होत असताना, कोणकोणत्या अडचणी निर्माण होऊ शकतात किंवा कोणत्या प्रदेशांमध्ये एखादा व्यवसाय विकसित होण्यासाठी आदर्श परिस्थिती आहे या बाबी देखील आपणास आर्थिक भूगोलाच्या अभ्यासातून समजण्यास मदत होते. आर्थिक **भूगोलाच्या कृषी भूगोल, औद्योगिक भूगोल, व्यापारी भूगोल, वाहतूक आणि दळणवळणाचा भूगोल, पर्यटन भूगोल, विपणन भूगोल, साधनसंपदा** भूगोल अशा विविध शाखा निर्माण होतात. मानवी विकासामध्ये आर्थिक भूगोलाचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. मानवी क्रियांवर सभोवतालची परिस्थिती म्हणजेच पर्यावरणाचा सर्वाधिक परिणाम होत असतो. त्यामुळे इतर विद्याशाखांमध्ये देखील पर्यावरणीय दृष्टिकोनातून मानवाच्या आर्थिक क्रियांना अतिशय महत्त्व देण्यात आलेले आहे. अर्थशास्त्र आणि वाणिज्य यासारख्या विद्याशाखांमधून पर्यावरणीय घटकांचे अध्ययन आणि अध्यापन अलीकडच्या काळात होऊ लागले आहे. म्हणून आर्थिक भूगोल ही अलीकडील काळातील मानवी भूगोलाची अतिशय महत्त्वाची उपशाखा आहे

### १) कृषी भूगोल (Agricultural Geography)

ही आर्थिक भूगोलाची प्रमुख शाखा म्हणून कृषी भूगोलास ओळखले जाते. कृषी भूगोल या शाखेचा विकास १९ व्या शतकात झाला. शेती आणि शेती संबंधीत इतर घटकांचा सविस्तर आणि शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास कृषी भूगोलामध्ये केला जातो. **हिलमन, ऑस्ट्रेम्बा ई, रिडस् एल. जे. जसबिर सिंग** या भूगोल तज्ञांनी कृषी भूगोलाच्या विविध व्याख्या केलेल्या आहेत. कृषी भूगोलाच्या अभ्यासामध्ये भौगोलिक घटकांचा कृषीवर होणारा प्रभाव, शेतीचे जागतिक पातळीवरील वितरण, या वितरणास कारणीभूत असणारे घटक आणि तांत्रिक घटक यांचा समावेश होतो. पृथ्वीच्या पृष्ठभागावर घेतल्या जाणाऱ्या विविध **पिकांवर, फळझाडांवर, पिंकाच्या उत्पादनावर तेथील नैसर्गिक व मानवनिर्मित** घटकांचा कसा प्रभाव पडतो. यांचा अभ्यास केला जातो. तसेच विविध कृषी हवामान पट्ट्यात **पिकाचे प्रकार, पिक रचना, पिक पध्दती, शेतीचे प्रकार, शेतीवर परिणाम करणारे घटक, शेतीच्या समस्या, शेतीची उत्पादकता त्यामध्ये उत्पादकता** कशी बदलते व त्यानुसार भूपृष्ठावर विविध कृषी प्रदेशाची कशी निर्मिती होते, शेतीपूरक विविध व्यवसाय, आधुनिक शेती, शेतीसंबंधीत क्षेत्रातील विविध क्रांत्या, शेती क्षेत्रातील विज्ञान आणि तत्रंज्ञानाचा वाढलेला उपयोग यांचाही अभ्यास केला जातो. शेतीच्या विकास अवस्था तसेच तिच्या आर्थिकलाभावरून उदरनिर्वाहाची शेती, सधन शेती, संमिश्र शेती व्यापारी शेती, मळयाचीशेती इत्यादी प्रकार पाडले जातात.

कृषी भूगोलाच्या अभ्यासामध्ये **पशूपालन, कुकुटपालन, मस्य शेती, तसेच वन शेतीचाही** समावेश होतो. कृषी भूगोलामध्ये आर्थिक दृष्ट्या पिकांचे उत्पन्न कसे फायदेशीर होईल याकडे लक्ष्य दिले जाते. विविध पातळयांवर शेतीचे नियोजन करत असताना कोणकोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे याची माहिती आपणास कृषी भूगोलाच्या अभ्यासातून समजण्यास मदत होते.

### २) औद्योगिक भूगोल (Industrial Geography)

संपूर्ण विश्वामध्ये झपाटयाने होऊ लागलेल्या औद्योगिकरणामुळे औद्योगिक भूगोल या शाखेला महत्त्व आलेले आहे. औद्योगिक विकासाची सुरूवात १८ व्या शतकामध्ये युरोप खंडात झाली. युरोपात सुरू झालेले औद्योगिकरण हळू हळू जगाच्या प्रत्येक देशामध्ये पोहचले. औद्योगिक विकासामुळे मानवाच्या राहणीमानाचा स्तर उंचावला तो चांगल्या प्रतिचे जीवन व्यतीत करू लागला. औद्योगीकरणाचे चांगले तसेच काही वाईट परिणाम घडून आली. भौतीकदृष्टया मानवाची प्रगती झाली परंतू पर्यावरणीय अनेक समस्या औद्योगीकरणामुळेच निर्माण झाल्या. **उद्योगधंदे आणि औद्योगीक प्रगतीवर नैसर्गिक घटकांचा सर्वाधिक प्रभाव होत असतो.** त्यामुळे पर्यावरणीय दृष्टीकोनातून औद्योगीक घटकांचा अभ्यास औद्योगिक भूगोलामध्ये केला जातो. औद्योगिक भूगोलात विविध **उद्योगधंदे, त्यांचे वितरण, केंद्रीकरण, विकेंद्रीकरण, उद्योगांच्या स्थानिकीकरणावर परिणाम करणारे घटक, उद्योगांमुळे होणारे सामाजिक सांस्कृतिक आर्थिक आणि पर्यावरणीया बदल आणि समस्या, विविध प्रकारची औद्योगिक धोरणे** यांचा अभ्यास केला जातो. औद्योगिक भूगोलाचा अभ्यास **आफ्रेड वेबर, ऑगस्ट, लॉश, वॉल्टर आयझार्ड, जार्ज रेनर,** या भूगोल तज्ञांनी करून औद्योगिकरणा संदर्भात विविध प्रतिमाने विकसीत केली आहेत. औद्योगिक क्रांतीनंतर जगात उद्योगधंद्यांचा विकास झपाट्याने होऊ लागला. औद्योगिक प्रगतीबरोबर विशिष्ट प्रश्नही संशोधकास भेडसावू लागले त्यांचा स्वतंत्र अभ्यास देखील अलीकडील काळामध्ये औद्योगिक भूगोलामध्ये केला जाऊ लागला आहे.

### ३) व्यापारी भूगोल (Commercial Geography)

व्यापारी भूगोल ही देखील आर्थिक भूगोलाची एक महत्त्वाची शाखा आहे. **व्यापारांचे अभिक्षेत्रीय घटक, व्यापार, वस्तूंची प्रादेशिक विविधता, व्यापाराची दिशा, जागतिक व्यापार संघटना** इत्यादी घटकांचा अभ्यास व्यापारी भूगोलात केला जातो. पृथ्वीच्या पृष्ठभागावरील भिन्न पर्यावरणामुळे सर्व आवश्यक बाबींचे उत्पादन सर्वच ठिकाणी होत नाही. उत्पादनातील या प्रादेशिक भिन्नतेमुळे वस्तू विनिमयातून व्यापार चालू झाला. अलीकडे निर्माण झालेल्या विविध व्यापारी संघटना व देशा देशातील तसेच देशांतर्गत होणारा विविध वस्तूंच्या व्यापाराचा अभ्यास व्यापारी भूगोलात केला जातो. कोणत्याही प्रकारचा व्यापार हा भौगोलिक घटकशी संबंधीत असतो. त्यामुळे व्यापारी भूगोलाची व्याख्या करताना असे म्हणतात की, **व्यापारी भूगोल म्हणजे व्यापाराशी संबंधीत भौगोलिक घटकांचा अभ्यास होय.** जगातील भौगोलिक परिस्थितील सर्वत्र

सारखीच नाही. जगामध्ये शेती, खनिजे, साधनसंपत्ती यांचे वितरण असमान झालेले आहे. त्यामुळे एखादया प्रदेशामध्ये एखादया वस्तूचे उत्पादन अधिक प्रमाणात होते. या गरजेपेक्षा अधिक उत्पादीत वस्तू इतर प्रदेशांमध्ये निर्यात करून व्यापाराची निर्मिती होत असते. मानवाच्या गरजा जगाच्या पाठीवर थोडयाफार फरकाने सर्वत्र सारख्याच असतात. या गरजांच्या पूर्तीसाठी व्यापारी संबंध विकसीत होत असतात. उदा. **भारतातून जगभर मसाल्याचे पदार्थ, कापड इ. पदार्थ निर्यात केले जातात.** प्रगत देशातील औद्योगिक उत्पादने इतर विकसनशिल व अविकसीत देशांमध्ये निर्यात केली जातात. व्यापारी भूगोलाच्या अभ्यासामध्ये ॲडम स्मिथ, डेव्हीड रिकार्डो या सारख्या अर्थतज्ञांनी मोलाची भर घातलेली आहे. अलीकडील काळामध्ये व्यापाराचे स्वरूप वस्तू किंवा पदार्थ यांच्यापुरते मर्यादीत न राहता विविध सेवांचाही व्यापार होऊ लागला आहे. **मल्टी लेव्हल मार्केटींग, ऑनलाईन** सेवा यामुळे व्यापारामध्ये कमालीची भर पडलेली आहे. व्यापाराशी संबंधी सर्वकंश भौगोलिक घटकांचा अभ्यास व्यापारी किंवा वाणिज्य भूगोल या मानवी भूगोलाच्या शाखेमध्ये केला जातो.

**४) वाहतूक भूगोल (Transportation Geography)**

वाहतूक आणि दळणवळणास मानवाच्या विकासामध्ये अतिशय महत्त्व आहे. वाहतूक आणि दळणवळणाच्या संदर्भात असे म्हणतात की मानवाच्या शरीरामध्ये रक्तवाहीन्याच्या जाळयाची भूमिका असते तद्‌वतच **देशाच्या विकासामध्ये वाहतूकीच्या जाळयाचे महत्त्व असते.** एखादया प्रदेशातील **आर्थिक विकास हा वाहतूकीच्या साधनांमुळे होतो. किंवा वाहतूकीची साधने उपलब्ध नसल्यास तो खुंटतो.** वाहतूक आणि दळणवळणाचा अभ्यास पूर्वी आर्थिक भूगोलामध्येच केला जात असे. परंतू १९ व्या शतकामध्ये वाहतूकीच्या सुविधांचे वाढते महत्त्व विचारात घेता. भूगोलाच्या स्वतंत्र शाखेद्वारे वाहतूक आणि दळणवळणाचा अभ्यास करण्यास सुरूवात झाली. वाहतूक आणि दळणवळणावर भौगोलिक घटकांचा प्रभाव होत असतो. एखादया प्रदेशातील **भूपृष्ठरचना आणि हवामान हे दोन भौगोलिक घटक वाहतूक आणि दळणवळणाच्या विकासावर परिणाम करणारे निर्णायक घटक आहेत.** पुरेसे भांडवल उपलब्ध असतानाही पर्वतीय प्रदेशात वाहतूकीच्या सुविधा विकसीत होत नाहीत. जगाच्या पाठीवर मैदानी प्रदेशात वाहतूकीचे जाळे सर्वाधिक चांगल्या प्रकारे विकसीत झालेले दिसते. वाहतूकीचे **रस्ते, रेल्वे, हवाई आणि जलवाहतूक** असे सर्व पर्याय उपलब्ध असलेल्या प्रदेशांचा आर्थिक विकास जलदगतीने होतो. व्यापार, औद्योगिक विकास, नागरीकरण हे वाहतूकीमुळे विकसीत होणारे घटक आहेत. त्यामुळे वाहतूक आणि दळणवळणाच्या भूगोलामध्ये वाहतूकीसंदर्भातील भौगोलिक घटकांचा अभ्यास केला जातो. वाहतूक भूगोलामध्ये **वाहतूकीचे प्रकार, मार्ग, साधने, समस्या, विकासावर परिणाम करणारे घटक, या सारख्या घटकांचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास होतो.** वाहतूक मार्गाचे जाळे, त्यांचे परस्परांशी समायोजन, त्यांचा प्रादेशिक विकासातील सहभाग,

वाहतूकीसंदर्भाती धोरणे यांचाही अभ्यास अलीकडील काळात वाहतूक भूगोलामध्ये होऊ लागलेला आहे. भूगोल अभ्यासामध्ये वाहतूकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वाहतूकी संदर्भात नवीन मार्ग तयार करणे, वाहतूकीच्या साधनांचा विकास, तसेच वाहतूक नियोजन करण्यासाठी आधुनिक काळामध्ये भौगोलिक माहितीप्रणाली हे महत्त्वाचे साधन उपयोगात आणले जात आहे.

**६) साधनसंपत्ती भूगोल (Resource Geography)**

ही आर्थिक भूगोलाची एक महत्त्वाची स्वतंत्र शाखा मानली जाते. साधनसंपत्तीचा विकास व वापर ही आधुनिक भूगोलाची महत्त्वाची संकल्पना आहे. **साधनसंपत्ती ही नाशवंत असते तर काही अविनाशी** असते. साधनसंपत्तीचे विविध प्रकारे वर्गीकरण केले जाते. वाढत्या लोकसंख्येचा मर्यादित साधन संपत्तीवर पडणारा ताण लक्षात घेऊन अविनाशी ऊर्जा व पर्यायी साधन संपत्तीचा वापर करण्यासाठी जनजागृती करण्याचा अंतर्भाव सुद्धा या शाखेत केला जातो. मानवी विकासात व मानवाच्या विविध गरजा पूर्ण करण्यामध्ये साधनसंपदा ही अतिशय महत्त्वाची असते. साधन संपत्तीची व्याख्या करताना असे म्हणतात की, **'मानवाच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता ज्या पदार्थात किंवा वस्तुत असते अशा पर्यावरणातील कोणत्याही पदार्थ किंवा वस्तूला साधनसंपदा असे म्हणतात' झिम्मरमन, जॅकी, स्मिथ, मॅकनाला, नोर्टन, गिंन्सबर्ग** इत्यादी अभ्यासकांनी साधनसंपत्तीचा अर्थ सांगितलेला आहे. **साधनसंपत्तीचा अर्थ, प्रकार, वर्गीकरण, महत्त्व, उपयोग, अभिक्षेत्रीय वितरण, साधनसंपदेच्या संदर्भात निर्माण झालेल्या समस्या या सर्व घटकांचा शास्त्रीय व सर्वसमावेशक अभ्यास** करणाऱ्या मानवी भूगोलाच्या शाखेला साधनसंपदा भूगोल असे म्हणतात. या साधनसंपतीमध्ये नैसर्गिक घटकांबरोबर मानवनिर्मित घटकांचाही समावेश होतो उदा. **जल, मृदा, हवा, प्राणी, वनस्पती, ऊर्जा साधने, खनिजे, आणि मूलद्रव्य** इ. मानवाने आपल्या भौतिक विकासासाठी साधनसंपदेचा अमर्याद उपयोग केलेला आहे. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीवर त्याचे विपरीत परिणाम झालेले आहेत. या मधून वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. उदा. **ऊर्जा समस्या, जागतिक तापमान वाढ, निर्वणीकरण, जैवविविधतेचा ऱ्हास, पाणीटंचाई, जलप्रदूषण, मृदाप्रदूषण, हवा प्रदूषण** इ. भविष्य काळामध्ये या समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा विचारात घेऊन साधन संपदेचा नियोजनपूर्वक वापर केल्यास मानवी विकासाला अडथळा येणार नाही. परंतु **नियोजनशून्य भरमसाठ वापरामुळे भविष्यामध्ये साधनसंपत्तीच्या संदर्भात विविध प्रकारच्या समस्या निर्माण होऊ शकतात.** या समस्या टाळण्यासाठी आणि पर्यावरणाचे संतुलन अबाधित ठेवण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. जसे **ऊर्जा संवर्धन, जलसंवर्धन, वनसंवर्धन, मृदा संवर्धन**, इत्यादी. पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी साधनसंपत्तीचा उपयोग कशाप्रकारे केला जावा साधनसंपत्तीचे जागतिक पातळीवर असणारे वितरण या संदर्भातील अनेक घटकांचा अभ्यास साधन संपदा भूगोल या मानवी भूगोलाच्या शाखेमध्ये

सविस्तरपणे केला जातो. एखाद्या प्रदेशात कोणत्या प्रकारच्या साधनसंपदा अस्तित्वात आहेत आणि त्यांच्या विकासाला कितपत वाव आहे हे साधंनसंपदेचे मापन केल्याने लक्षात येते. अलीकडील काळात भौगोलिक माहिती प्रणालीचा आधारे साधनसंपत्तीचे अभिक्षेत्रीय वितरण समजून त्याचे नियोजन करणे शक्य होत आहे.

**७) पर्यटन भूगोल (Tourism Geography)**

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. पर्यटन भूगोल ही आर्थिक भूगोलाची प्रमुख उपशाखा आहे. पर्यटन भूगोलामध्ये **पर्यटनस्थळाचा उगम, विकास, त्याची रचना, प्रकार, पर्यटकांचा प्रकार, पर्यटनातील नव्याने विकसीत होत असणाऱ्या संकल्पना, पर्यटनाचे व्यावसायिक महत्त्व, निवासस्थाने, वाहतूक यांचा असणारा प्रभाव, पर्यटन संस्था, पर्यटनासंदर्भातील धोरणे तसेच पर्यटन स्थळांचा तेथील सामाजिक आर्थिक बाबीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्यात येतो.** २० व्या शतकातील तांत्रिक व वैज्ञानिक प्रगतीमुळे आणि २१ व्या शतकात त्यात झालेल्या वृध्दीमुळे वेगवेगळे व्यवसाय विकसित झाले. पर्यटन हा त्यापैकीच अगदी अलीकडच्या काळातील भरभराटीस आलेल्या व्यवसायापैकी एक आहे. प्रारंभीक काळापासून प्रवास ही मानवाची मुलभूत गरज राहिलेली आहे. प्रारंभीक काळात गरज म्हणून केला गेलेला प्रवास आज मितीस पर्यटनामध्ये परिवर्तत झाला आहे. त्यामुळे **प्रवास आणि पर्यटन या माणसाच्या मुलभूत गरजा** बनल्या आहेत. पर्यटन या व्यवसायाने अनेक लोकांना रोजगाराच्या संधीही प्राप्त झालेल्या आहेत. भूगोल आणि पर्यटन एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे बहुतांशी पर्यटन स्थळे ही भौगोलिक घटकांशी संबंधीत असतात. त्यामुळे भूगोल अभ्यासकांना पर्यटन स्थळांचा पर्यायाने पर्यटनाचा सखोल अभ्यास करावा लागतो. पर्यटनामुळे भौगोलिक व सांस्कृतिक भूदृश्यांमध्ये बदल होतो. सांस्कृतिक भूदृशांची रचना ही मुलत: भौगोलिक घटकांमुळे झाली असल्याचे दिसते. कोणत्याही स्थळाचा सांस्कृतिक विकास होत असतो, तेव्हा त्या स्थळाचा भौगोलिक वारसा संपन्न असल्याचे दिसते. जितका भौगोलिक वारसा समृध्द असतो, तितका त्या स्थळाचा सांस्कृतिकदृष्टया विकास चांगला होतो. सर्व प्रकारची पर्यटन स्थळे उदा: **ऐतिहासिक गड किल्ले, स्मारके, धार्मिक पवित्र स्थळे, सामाजिक व सांस्कृतिक स्थळांचा आणि भौगोलिक घटकांचा म्हणजेच नैसर्गिक घटकांचा घनिष्ठ संबंध असतो.** सर्व प्रकारच्या पर्यटन स्थळांना नैसर्गिक पार्श्वभूमी लाभलेली असते. एखादया पर्यटन स्थळावरील स्थान महात्म्याशिवाय त्या पर्यटन स्थळावरील **स्थल वैशिष्टये, निसर्ग सौदर्य, परिसर गुणवत्ता, भूपृष्ठीय उठाव, आणि पर्यटन स्थळांवरील अल्हाददायी हवामान, तसेच वेगवेगळया प्रजातीच्या वनस्पती व प्राणी यामुळे पर्यटन स्थळांना विशिष्ट महत्त्व प्राप्त होते.** पर्यटन स्थळावरील विविध निसर्गरम्य देखावे, जाण्यायेण्याचे विविध मार्ग, पायवाटा, पाणवठे, झरे, डोंगर, दऱ्या, कडेकपाऱ्या आणि निसर्ग संपन्न निवासस्थाने हे सर्व घटक पर्यटकांना आकर्षित करत असतात. त्यामुळे विविध कारणांसाठी पर्यटन केले जात असले तरी सर्व प्रकारच्या पर्यटनामध्ये नैसर्गिक सृष्टी सौदर्याचा

आस्वाद घेतला जातो. नैसर्गिक पर्यटन स्थळांना भेटी देणाऱ्या पर्यटकांची संख्याही अधिक असते. पर्यटनामध्ये नैसर्गिक घटकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अगदी पर्यटनाला जाण्याच्या आधी पर्यटनाचे नियोजन करत असताना पर्यटक **नकाशाच्या आधारे रस्ते, वाहतूकीचे विविध मार्ग, प्रादेशिक अंतरे, त्या प्रदेशातील हवामान व इतर घटकांची माहीती भौगोलिक घटकांच्या अभ्यासातूनच मिळवत असतो.** ही माहिती मिळवत असताना पर्यटकाला भौगोलिक ज्ञानाचा उपयोग होत असतो. याशिवाय नैसर्गिक दृष्टया संपन्नता असणारी विविध पर्यटन आकर्षणे यांची संख्याही अधिक असते. भविष्यात वेगाने विकसीत होणारा व्यवसाय म्हणून पर्यटनाकडे पाहिले जाते. त्यामुळे पर्यटनासंदर्भातील अनेक घटकांचा अभ्यास मानवी भूगोलाच्या या शाखेमध्ये केला जातो.

### ८) विपणन भूगोल (Marketing Geography)

विपणन भूगोल या आर्थिक भूगोलाच्या शाखेचा विकास अलीकडच्या काळात झालेला आहे. विसाव्या शतकात विपणन भूगोलाच्या अभ्यासाला सुरुवात झाली औद्योगिक क्रांती व तांत्रिक प्रगतीमुळे जगात विविध वस्तूंचे व पदार्थांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. हे वाढलेले उत्पादन ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विपणनाची गरज निर्माण झाली. विपणन किंवा **मार्केटींग ही एक व्यापक प्रक्रिया** असून वस्तूंच्या उत्पादनानंतर विविध माध्यमांमधून ग्राहकांपर्यंत वस्तू पोहोचविणे हा विपणन किंवा मार्केटिंगचा प्रमुख हेतू असतो. **उत्पादित वस्तू ग्राहकांपर्यंत पोहोचवीत असताना विविध मार्गांचा व माध्यमांचा उपयोग** केला जातो. मार्केटिंग या प्रक्रियेवर भौगोलिक घटकांचा प्रभाव पडत असतो. एखाद्या प्रदेशात, विशिष्ट हवामानामध्ये विशिष्ट प्रकारच्या वस्तूचे उत्पादन अधिक प्रमाणात होत असते, तर एखाद्या प्रदेशांमध्ये विशिष्ट वस्तूंना अधिक प्रमाणात मागणी असते. या सर्व घटकांवर भौगोलिक घटकांचा प्रभाव असतो. जसे शीत हवामानाच्या प्रदेशात उबदार कपड्यांना अधिक प्रमाणात मागणी असते. विपणन भूगोलामध्ये **घाऊक व किरकोळ व्यापार, लहान मोठी दुकाने, मॉल, सुपर मार्केट, फेरीवाले, दैनंदिन बाजार, आठवडे बाजार, एक्जीबिशन्स, प्रदर्शने, महोत्सव,** यांचा अभ्यास केला जातो. मार्केटिंग करण्याच्या संदर्भात असणारी तत्वे, नियम, प्रतिमाने, आणि सिद्धांत यांचाही शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. एखाद्या प्रदेशातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मार्केटिंग संदर्भात कोणते नियम फायदेशीर ठरतील याचाही अभ्यास विपणन भूगोलामध्ये केला जातो. अलीकडील काळात ऑनलाइन मार्केटिंग अधिक प्रमाणात होत आहे. ऑनलाइन मार्केटिंगच्या संदर्भात विशिष्ट प्रकारचे **सर्वेक्षण** करून कोणत्या मालाचा खप कोणत्या प्रदेशांमध्ये अधिक प्रमाणात होऊ शकतो याचादेखील अभ्यास विपणन भूगोलामध्ये केला जातो.

## ब) सामाजिक भूगोल आणि सांस्कृतिक भूगोल (Social and Cultural Geography)

मानवी भूगोलाची ही दुसरी प्रमुख शाखा आहे. मानवाचा भूगोल व्यक्तिगत पातळीवर अभ्यास न करता मानवाच्या सामूहिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. मानवाच्या सामूहिक वर्तनाचा अभ्यास करत असताना त्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा असतो. मानवाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बाबींवर भौगोलिक घटकांचा प्रभाव असतो. एखादया प्रदेशातील **वांशिक रचना, धर्म, जात, भाषा, रूढी, परंपरा, चालीरिती, सण आणि उत्सव, लोकसंख्येची रचना, मानवाची वस्ती, राजकीय तसेच ऐतिहासीक वैशिष्टये** या सर्व घटकांवर भौगोलिक घटक दूरगामी परिणाम करत असतात. त्यामुळे मानवाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा अभ्यास मानवी भूगोलाच्या विविध उपशाखांद्वारे केला जातो. मानवी भूगोलाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोनातून खालील उपशाखा अत्यंत महत्त्वाच्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

### १) लोकसंख्या भूगोल (Population Geography)

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वाचे शाखा असून १९५० नंतर या शाखेचा विकास झालेला आहे. यापूर्वी **लोकसंख्याशास्त्र (Demography)** म्हणून लोकसंख्येचा अभ्यास केला जात असे. मात्र या अभ्यासामध्ये भौगोलिक दृष्टिकोण नाममात्र होता. एप्रिल १९५३ अमेरिकन संशोधकांच्या झालेल्या लोकसंख्याविषयक बैठकीत **'जी. टी. त्रिवार्था'** यांनी लोकसंख्या भूगोल ही स्वतंत्र शाखा घोषित केली. या बैठकीमध्येच त्यांनी लोकसंख्या भूगोलाबद्दल सविस्तर माहिती सांगितली. नंतरच्या काळामध्ये अनेक भूगोल तज्ञांनी लोकसंख्या भूगोलात भरीव स्वरूपाची कामगीरी केली आहे. जी. टी. त्रिवार्था यांनी लोकसंख्या भूगोलाची व्याख्या स्पष्ट करताना असे म्हटले की, **'प्रादेशिक भिन्नतेनुसार मानव जातीमधील वेगळेपणा समजून घेणे म्हणजेच लोकसंख्या भूगोल होय.** कार्ल्क या ब्रिटीश भूगोलतज्ञाच्या मते लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येचे वितरण, आंतररचना, स्थलांतर आणि लोकसंख्या वाढ यांचा नैसर्गिक विविधतेशी असणाऱ्या संबंधांचा अभ्यास करणारे शास्त्र होय. लोकसंख्या भूगोलामध्ये **लोकसंख्येचे मोजमाप, लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येची रचना, वयोगट रचना, लिंग रचना, व्यवसायिक रचना, साक्षरता, लोकसंख्येचे स्थलांतर, नागरीकरण, लोकसंख्या विषयक धोरण, लोकसंख्या विषयक विविध सिद्धांत आणि प्रतिमाने** याबाबत सविस्तर अभ्यास केला जातो. भौगोलिक घटकांचा दूरगामी परिणाम लोकसंख्येच्या वितरणावर होत असतो, त्यामुळे हा देखील लोकसंख्या भूगोलाचा एक महत्त्वाचा अभ्यास घटक आहे. जगातील विशिष्ट प्रदेशांमध्ये लोकसंख्येची घनता अधिक आढळून येते तर काही प्रदेशात लोकसंख्येची घनता अतिशय विरळ आहे. लोकसंख्या वाढ ही जागतिक पातळीवर भेडसावणारी अतिशय महत्त्वाची समस्या आहे. भारतासह चीन, इंडोनेशिया, बांगलादेश, पाकिस्तान तसेच आफ्रिकेतील काही देशांमध्ये लोकसंख्येचा विस्फोट झालेला आहे. लोकसंख्या वाढीमुळे अनेक समस्याही निर्माण झालेल्या

आहेत. लोकसंख्या विषयक विविध प्रकारच्या **समस्या निराकरण** करण्यासाठी लोकसंख्या भूगोलाच्या माध्यमातून **उपायोजना किंवा धोरणे** ठरवण्यासाठी दिशा दिली जाते. एखाद्या देशाची लोकसंख्या ही त्या देशाची समस्यांना न बनता त्या देशाची साधन संपदा कशाप्रकारे होऊ शकेल, संख्यात्मकदृष्ट्या लोकसंख्येची वाढ न होता गुणात्मक पातळीवर लोकसंख्येची वाढ होऊन लोकसंख्येला साधनसंपत्तीमध्ये परिवर्तित करण्यासाठी लोकसंख्या भूगोल अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.

**२) वसाहत भूगोल (Settlement Geography)**

वस्ती भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वाची शाखा आहे. मानवी वसाहतीचे **ग्रामीण वसाहती व नागरी वसाहती** असे दोन प्रकार पडतात. मानवी वस्त्यांची रचना आणि वितरण जगातील सर्व प्रदेशात सारखे नाही. **मानवी वस्त्यांची रचना, आकार, प्रकार, वितरण, त्यामध्ये होणारी वाढ,** यामध्ये जागतीक पातळीवर प्रचंड भिन्नता आढळते. वस्ती संदर्भातील अभिक्षेत्रीय बदलांवर भौगोलिक घटकांचा सर्वाधिक प्रभाव होत असतो. १९ व्या शतकामध्ये **रॅटझेल, हेरॉल्ड, मेयर, डडले, स्टॅम्प, ग्रिफिथ टेलर, दमॉजिऑ, जिन ब्रुन्स** यानी वस्ती भूगोलाच्या विकासामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे. वस्ती भूगोलामध्ये वस्त्यांच्या विकासावर परिणाम करणारे घटक, वस्त्यांची कार्ये आणि वैशिष्ट्ये, वस्त्यांची रचना या आधारे ग्रामीण आणि नागरी वस्त्या हे दोन प्रमुख प्रकार होतात. त्यातील अलीकडे नागरी भूगोलाला अतिशय महत्त्व प्रात झाले आहे. याचे कारण म्हणजे जगाचे झपाटयाने होत जाणारे नागरीकरण होय. नागरी भूगोलात नगराचे **स्थान, स्थिती, नगरचा ऐतिहासिक विभाग, नगर संरक्षण, नागरी कार्य, एका नगराची दुसऱ्या नगराची असलेले संबंध, नगराचे वर्गीकरण, नागरी प्रभाव क्षेत्र, नागरी समस्या, नगर श्रेणी रचना, नगरांतर्गत वाहतूक, नगराचा विस्तार** इत्यादी घटकांचा अभ्यास केला जातो. वसाहात भूगोलाची ग्रामीण भूगोल ही एक उपशाखा आहे. यात ग्रामीण वसाहती, त्यांचे स्वरूप, व्यवसाय यांचा अभ्यास केला जातो. यात मुख्यत करून शेती व्यवसायाचे चित्रण होते. ग्रामीण वसाहतीच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला जातो. ग्रामीण वस्तीचे स्थान निश्चितीवर परिणाम करणाऱ्या विविध प्राकतिक आणि सांस्कृतिक घटकांचा अभ्यास ग्रामीण वसाहतीच्या भूगोलामध्ये केला जातो. अशा प्रकारे वसाहतीच्या विविध अंगांचा विशेष अभ्यास त्या त्या शाखेत केला जातो. वस्ती विकासाच्या अनुषंघाने ग्रामीण भागातील **चार घरांची वस्ती ते मेगा सिटी हा होणारा प्रवास, या परिवर्तनाचे टप्पे,** कोणत्या भागामध्ये नागरी वस्त्यांच्या विकासाला वाव आहे याचा आधुनिक पध्दतीने अभ्यास अलीकडील काळामध्ये वस्ती भूगोलामध्ये केला जात आहे.

**३) सामाजिक भूगोल (Social Geography)**

सामाजिक भूगोल ही मानवी भूगोलाची एक मुख्य शाखा. मानवी समाजाच्या विविध पैलूंचा अभ्यास या शाखेत केला जातो. सामाजिक भूगोल ही नव्याने उदयास आलेली शाखा आहे. समाजाचा

आकार जसजसा विस्तृत होऊ लागला, **समाजरचना गुंतागुंतीची बनू लागली व सामाजिक समस्यांची संख्या व तीव्र ता वाढत आहे. ई. डब्ल्यू. गिल्बर्ट व आर. डब्ल्यू. स्टील** या तज्ज्ञांच्या मते **'विविध पर्यावरणातील सामाजिक समुदायांचे वितरण व त्यांची जीवनशैली तसेच अधिवास, आरोग्य आणि वेगवेगळया लोकसमूहांतील लोकांची स्थिती यांचे भौगोलिक विश्लेषण म्हणजे सामाजिक भूगोल'** होय. याशिवाय सामाजिक भूगोलात **लोकसंख्या, लोकसंख्येची वाढ, लोकसंख्येचे वितरण व संरचना, स्थलांतर, मानवी वसाहती, वसाहतींचा उगम, विकास, प्रारूप व त्यांचे वितरण, स्थलांतर, मानव समूहातील शारीरिक व सांस्कृतिक भिन्नता, आर्थिक व्यवसायांतील विविधता मानवाचे सांस्कृतिक वर्तन, वेगवेगळ्या समाजघटकांमधील परस्परसंबंध, सामाजिक गुन्हेगारी मानवी समाजाचे अभिक्षेत्रीय वितरण,** इ. मानवी समाजघटकांचा अभ्यास केला जातो. जगाच्या वेगवेगळ्या भागांत तेथील नैसर्गिक पर्यावरणाच्या, विशेषत: हवामानातील भिन्नतेनुसार विविध प्रकारचे सामाजिक जीवन आढळते. जर्मन भूगोलज्ञ **कार्ल रिटर, अलेक्झांडर फॉन हंबोल्ट, हॅसिंगर, रू हल व हेटनर, फ्रेंच भूगोलज्ञ एलीझे रक्ल्यू, अमेरिकन भूगोलज्ञ जॉर्ज पेर्किन्स मार्श व ब्रिटिश भूगोलज्ञ एच. जे. मॅकिंडर** हे सामाजिक भूगोलशास्त्राचे प्रवर्तक मानले जातात. सामाजिक भूगोल या विषयाच्या संदर्भातील अनेक संकल्पना या तज्ञांनी स्पष्ट केल्या आहेत. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भूगोलतज्ञांनी समाज आणि पर्यावरण यांच्यातील आंतरक्रियांच्या अभ्यासावर विशेष भर दिला. अँग्लो अमेरिकन परंपरेतील तज्ञ **जॉर्ज विल्सन होक** याचा **'द स्टडी ऑफ सोशल जिऑग्रफी'** हा शोधनिबंध १९०७ मध्ये प्रसिध्द झाला. त्यात त्याने 'सामाजिक भूगोल' ही संज्ञा वापरली होती. वाढती लोकसंख्या, मानवी वसाहती, नागरीकरण व त्यांमुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या इ. अभ्यासविषय सामाजिक भूगोलात समाविष्ट होऊ लागले. कोणत्याही प्रदेशातील मानवी जीवनावर तेथील भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. अनेक भूगोलज्ञांनी नैसर्गिक पर्यावरणातील घटकांचा आधार घेऊन हे स्पष्ट केले आहे. त्याशिवाय **स्त्रिया, वृद्घ, गरीब, अल्पसंख्याक, मनोरुग्ण, गुन्हेगार, सामाजिक विषमता, सामाजिक विकृती, निवासाचे प्रश्न इ. समस्यांची कारणे, उपाययोजना आणि सामाजिक कल्याण** यांचा विचार सामाजिक भूगोल तज्ञ करीत असतात. त्याचप्रमाणे विविध प्रदेशांतील नैसर्गिक पर्यावरणाचा या सर्व घटकांवर व त्यांच्या अभिक्षेत्रीय वितरणांवर कसा परिणाम होतो, त्याचाही अभ्यास या शाखेत केला जातो. मानवाच्या आणि समाजाच्या स्वास्थ्यासाठी **दारिद्रय, उपासमार, गुन्हे, वर्णभेद, सामाजिक विषमता, नैसर्गिक आपत्ती** इ. बाबींची जाणीवपूर्वक दखल घेऊन अभ्यास केला जात आहे. अशाप्रकारे एकविसाव्या शतकात येऊ घातलेली विविध आव्हाने स्वीकारण्याच्या दिशेने सामाजिक भूगोलाच्या प्रगतीची वाटचाल चालू आहे.

४) **सांस्कृतिक भूगोल (Cultural Geography)**

सांस्कृतिक भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वाची शाखा आहे. सामाजिक भूगोल आणि सांस्कृतिक भूगोल यामध्ये **वरकरणी जरी साम्य** वाटत असले तरी दोन्ही शाखांचा अभ्यासविषय मात्र भिन्न आहे. **मनुष्य व्यक्तिगत व सामूहिम पातळीवर जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवन साफल्यार्थ स्वत:वर व बाह्य विश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो, ती पद्धती किंवा तो आविष्कार म्हणजे संस्कृती होय**. इरावती कर्वे यांच्या मते '' मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी, पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय. भौगोलिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, **ज्ञान, धर्मविश्वास, कला, नीती, कायदे, आचार** आणि मानवाने समाजाचा सदस्य म्हणून जे संस्कार, समर्थता व सवयी आत्मसात केलेल्या असतात त्या सर्वांचा समग्र व संमिश्र परिपाक म्हणजे 'संस्कृती ऊर्फ सभ्यता होय''. मनुष्याच्या स्वभावात निसर्गत:च विविध प्रवृत्ती भरलेल्या आहेत. **श्रद्धा, सत्यनिष्ठा, मैत्री, सहानुभूती, परिश्रमाची आवड, दया, औदार्य, ज्ञानलालसा, तार्किक चिकित्सा, न्यायबुद्धी इ. सद्गुण आणि अंधश्रद्धा, मिथ्यावाद, मत्सर, व्देष, आलस्य, कौर्य, झोपाळूपणा,** विदयाविमुखता या सर्व घटकांचा अभ्यास सांस्कृतिक भूगोलामध्ये केला जातो. भाषा, वंश, धर्म, कला, चालीरिती, रूढी, परंपरा, सण, उत्सव, कर्मकांड, वर्णव्यवस्था, संस्कार, आख्यायिका, तत्त्वज्ञान व साहित्य पूजा अर्चा, यज्ञ विधी, पोषाख, नीतिविषयक कल्पना, सांकृतिक संकेत, लेखन कला, नृत्यकला, मूर्तीकला, स्थापत्य कला, जनांच्या मनात रूजलेली मिथके, उपहारगृहे किंवा राज्यसंस्था, न्यायसंस्था, बिगर शासकीय संघटना या सारख्या अनेक अमूर्त घटकांचे विश्लेषण सांस्कृतिक घटकांमध्ये केले जाते. मानवी संस्कृती ही अभिक्षेत्रीय असते, त्यामध्ये मोठया प्रमाणात प्रादेशिक भिन्नता आढळून येते.

५) **राजकीय भूगोल (Political Geography)**

राजकीय भूगोल ही मानवी भूगोलाची २० व्या शतकात विकसीत झालेली शाखा आहे. प्राचीन काळामध्ये **प्लेटो, ऑरिस्टॉटल** यांनी राजसंस्था, राजशिष्टाचार या संदर्भात समग्र लेखन केल आहे. मानवी जीवनावर राजकीय परिस्थितीचा प्रभाव पडतो. **राज्य, राष्ट्र, भूराजनिती, आपल्या देशाच्या सीमांचे इतर देशाची सीमाशी संबंध, सीमाची स्थिती, राष्ट्रातील कायदे, आर्थिक स्थिती, आर्थिक धोरण, परदेशी धोरण, अंतर्गत धोरण, नद्यांचे, सागररांचे आणि पर्वतांचे सामरिक महत्त्व, एखाद्या प्रदेशाचे भूराजनैतिक महत्त्व, विविध प्रकारच्या राजकीय समस्या, राजकीय संघटना, युध्द, मूलस्थाने,** इत्यादी विषय राजकीय भूगोलात अभ्यासले जातात. आधुनिक कालखंडामध्ये **कांट, रिटर, रॅटझेल, हार्टशार्न** यांनी राजकीय भूगोलाच्या संदर्भात व्यापक लेखन केले आहे. हॉर्टशॉर्न यांनी राजकीय भूगोलाचा आधुनिक विकास हा ग्रंथ लिहला आहे. या शिवाय **मॅकींडर, व्हिटलेसी, स्पायकमन, पॉडस, मुडी, रेनर** या भूगोलतज्ञांनीही मोलाचे योगदान

दिले आहे. एफ. जे. **मॅकींडर यानी मांडलेला हार्टलॅंड थिअरी** ही राजकीय भूगोलामध्ये प्रसिध्द आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण होणारे विविध पेचप्रसंग सोडविण्यासाठी राजकीय भूगोलातील तत्वांची मदत घेतली जाते. एखाद्या देशातील राजकीय व्यवस्था आणि भौगोलिक घटकांचा असणारा सहसबंध यांचाही अभ्यास राजकीय भूगोलामध्ये केला जातो. अलीकडील काळात निर्माण झालेल्या विविध पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी, जागतीक पातळीवर निकोप पर्यावरण विकसीत करून शाश्वत विकासासाठी जागतीक पातळीवर विविध संघटना कार्य करत आहेत. या संघटनांची कार्ये भौगोलिक ज्ञानावर अधारीत असातात म्हणून राजकीय भूगोलाचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

### ६) ऐतिहासिक भूगोल (Historical Geography)

ऐतिहासिक भूगोल ही मानवी भूगोलाची महत्त्वाची शाखा आहे. या शाखेत ऐतिहासिक घटना व प्राचीन काळापासून ते आजपर्यंत निरनिराळया देशांचा विस्तार, यांचे अध्ययन केले जाते. प्रत्येक भागातील **ऐतिहासिक घटनांमध्ये तेथील भौगोलिक परिस्थिती कारणीभूत** असते. कोणत्याही देशाचा विस्तार त्या भागातील पुनर्रचनेवर अवलंबून असतो. त्यामुळे इतिहासाच्या अभ्यासामध्ये भौगोलिक परिस्थितीला महत्त्व आहे. म्हणूनच पूर्वी बांधलेले **गड, किल्ले, राजवाडे, राजधान्या, हे तेतील भौगोलिक परिस्थितीचा विचार** करून मोक्याची आणि सुरक्षित ठिकाण निवडूनच बांधण्यात आली आहेत. वरील सर्व गोष्टींचा अभ्यास ऐतिहासिक भूगोलात केला जातो. भौगोलिक घटकांच्या संदर्भाशिवाय ऐतिहासीक घटना स्पष्ट करणे केवळ अशक्य असते. ऐतिहासीक भूगोलाच्या अभ्यासातून आपणास ऐतिहासीक घटनांचेच ज्ञान होते असे नाही तर **वर्तमान आणि भविष्य काळामध्ये करावयाच्या नियोजनासाठी** दिशाही मिळत असते. त्यामुळे ऐतिहासीक भूगोलाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

### ७) लष्करी भूगोल (Military Geography)

लष्करी भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वाची शाखा आहे. १९ व्या शतकात लष्करी भूगोलाच्या अभ्यासास सुरूवात झाली. **लष्करी डावपेचांसाठी नकाशाचा वापर** अगदी प्राचीन काळापासून केला जात आहे. विविध प्रकारच्या हवामानाची परिस्थिती निर्माण झाली असताना कोणत्या प्रकारची युध्दनिती अनुसरणे योग्य आहे, युद्धाच्या वेळी सैनिकास दुसऱ्या प्रदेशात जाऊन आथवा सीमावर्ती दुर्गम भागात जाऊन लढावे लागते. अशावेळी त्या प्रदेशाची **भूरचना, जल प्रणाली, हवामान, वन आच्छादन** या प्राकृतिक घटकांबरोबरच त्या प्रदेशातील मोक्याची ठिकाणे तेथील लोकांच्या चालीरीती, धर्म इत्यादी सामाजिक बाबींचा उपयोग लष्करी डावपेच ठरविण्यासाठी होतो. या सर्व बाबींचा अंतर्भाव लष्करी भूगोलाच्या अभ्यासात होतो. **सैनिकी शाळा, सैनिकी महाविद्यालय, सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालय, राष्ट्रीय संरक्षण अकादमी** इत्यादी सैनिकी शिक्षण देणाऱ्या संस्थेमध्ये भूगोल विषय म्हणूनच **सक्तीचा** ठेवला



HRMGEOG

आहे. थोडक्यात सर्व प्रकारच्या लष्करी कारवायांमध्ये भौगोलिक ज्ञान अत्यंत महत्त्वाचे असते. भौगोलिक ज्ञानाशिवाय लष्करी कारवाई फोल ठरू शकते म्हणून अनेक देशांमध्ये लष्करी भूगोल हा विषय सक्तीचा करण्यात आलेला आहे.

**८) वैद्यकीय भूगोल (Medical Geography)**

ही एक नव्याने विकसित होत असलेली सामाजिक भूगोलांची एक महत्त्वाची शाखा आहे. वैद्यकीय भूगोलास **आरोग्य भूगोल** असेही म्हटले जाते. १९७६ पासून **आरोग्य भूगोलास वैद्यकीय भूगोल असे म्हटले जाऊ लागले आहे.** मानवाच्या आरोग्य व स्वास्थ्य संबंधी या शाखेत अभ्यास केला जातो. भूपृष्ठावर फैलावणाऱ्या रोगांचा त्याच्या प्रदेशातील पर्यावरणाशी घनिष्ठ संबंध असतो. थोडक्यात **मानवास भेडसावणाऱ्या विविध रोगांचे भूपृष्ठावरील स्थळ काळातील वितरण व विश्लेषण केले जाते.** भूगोलातील नकाशांचा आधार घेऊन साथींच्या रोगांचे विश्लेषण केले जाते. एखादया प्रदेशात साथीचा रोग कितपत पसरलेला आहे. साथीच्या रोगाचे संक्रमण कोणत्या प्रदेशात होणे शक्य आहे याची माहिती भौगोलिक ज्ञानाद्वारे तात्काळ प्रसारित होते. तसेच उपलब्ध आरोग्य केंद्रे, हॉस्पिटल, विशिष्ट सेवा देणारी हॉस्पिटल जागतिक आरोग्य संघटना त्या संघटनांद्वारे पुरवल्या जाणाऱ्या विविध सोयी सुविधांचाही अभ्यास केला जातो.

**९) गुन्हेविषयक भूगोल (Crime Geography)**

मानवाचे स्वास्थ तो राहतो त्या समाजाशी निगडीत असते. मानवी समाजामध्ये अलीकडे वाढत्या लोकसंख्येबरोबर विविध समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. संपत्तीचे व साधन संपत्तीचे असमान वितरण, त्यातून श्रीमंत व गरीब यांच्यातील वाढती दरी, त्यामुळे **भूक, उपासमार, कलह, चोरी दरोडे, मारामारी यासारख्या घटना घडू लागल्या आहेत.** या घटना मानवाच्या सामाजिक स्वास्थ्याशी संबंधित आहेत. या गुन्ह्यांचे प्रमाण व प्रकार शहरी भागात तसेच ग्रामीण भागात वेगळे असते या सर्व बाबीशी भौगोलिक, सामाजिक, परिस्थितीचा संबंध असल्याने अगदी अलीकडे **भौगोलिक पार्श्वभूमीवर या गुन्ह्याचा अभ्यास होऊ लागला आहे.** भौगोलिक पार्श्वभूमीवर अधारीत अनेक गुन्हाचे स्वरूप असते. अमेरिकेमध्ये या संदर्भात मोठया प्रमाणात संशोधन झालेले आहे. **डेव्हीड हर्बर्ट यांचे १९८९ साली गुन्हेविषयक भूगोल** हे पुस्तक प्रसिध्द झाले आहे. विविध प्रकारच्या नुन्हाची उकल करण्यासाठी भौगोलिक ज्ञानाचा उपयोग केला जातो. त्यामुळे अलीकडील काळात गुन्हेविषयक भूगोलाचे महत्त्व वाढत आहे.

**१०). वर्तणूक विषयक भूगोल (Behavioural Geography)**

ही एक सामाजिक भूगोलाची उपशाखा आहे. **मानवाची वर्तणूक ही स्थलकालसापेक्ष असते**. विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट वेळी मानवाचे वर्तन एका विशिष्ट पद्धतीने घडून येते. मानवाचा निसर्गाला असणारा प्रतिसाद बहुतांशी सारखाच असतो. विविध प्रकारच्या आपत्तीजनक स्थितीमध्ये मानवाचे वर्तन जवळजवळ

सारखेच असते. परंतू काही सामाजिक संकल्पना विषयक मानवाच्या प्रतिसादामध्ये विविधता आढळून येते. माणसाची ग्राहक या भूमिकेतून एखाद्या बाजारपेठेतील वागणे स्थलकालसापेक्ष असते. उदा. छोट्या छोट्या नेहमी लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदीसाठी तो जवळच्या बाजारपेठ निवडतो या उलट दूरदर्शन संच, संगणक, तिजोरी, कपडे इत्यादी दीर्घकाळ टिकणाऱ्या किमती वस्तूंच्या खरेदीसाठी तो दूर अंतरावरच्या बाजारपेठेत जाणे पसंत करतो. व्यक्ती तितक्या प्रकृती या व्यक्तीनुसार प्रत्येक व्यकती कोणत्याही ठिकाणी बाजारपेठेमध्ये जाऊन वस्तू खरेदी शकतो म्हणून मानवाच्या वर्तणुकीचा अभ्यास वर्तणूक विषयक भूगोलामध्ये केला जाऊ लागला. मानवी वर्तनावर भौगोलिक घटकांमधील भूपृष्ठरचना, हवामान यांचा प्रत्यक्ष परिणाम होत असतो. मानवाची संस्कृती, त्याची कार्ये, वस्ती, या मध्ये स्थलकालसापेक्ष होणारे बदल हे वर्तनासंबधी असणारे बदल असतात.

**प्रादेशिक भूगोल (Regional Geography)**

भूगोलाचे अत्यंत महत्वाचे अंग म्हणजे प्रादेशिक भूगोल होय. ही **भूगोलाची शाखा अथवा उपशाखा नाही तर प्रादेशिक भूगोल हा भौगोलिक घटकांचा एकात्मिक अविष्कार आहे.** प्रादेशिक भूगोलाचा खंड देश, प्रदेश, स्थानिक क्षेत्र इत्यादी स्तरावर भौगोलिक घटकांच्या सदंर्भात अभ्यास केला जातो. एखादया प्रदेशाचे प्रमुख भौगोलिक वैशिष्टय लक्षात घेवून त्या प्रदेशाचे मानव व त्याचे प**र्यावरण, मानव व नैसर्गिक संपत्ती, भौगोलिक मर्यादा, प्रदेश आकारमान, प्रादेशिक नियोजन इ. प्रमुख संकल्पनांचे विश्लेषण प्रादेशिक भूगोलात केले जाते.** भौगोलिक सर्व ज्ञान शाखा व त्याच्या उपशाखा यांच्या कार्याने एखादया प्रदेशाचे सारांशात्मक केलेले विष्लेशण म्हणजे प्रादेशिक भूगोल होय. पृथ्वीवरील कोणतेही एक क्षेत्र पूर्णपणे विचारात घेतले जाते. त्या क्षेत्रातील भौगोलिक घटकांची भौतिक माहिती मिळवून तो प्रदेश इतर प्रदेशापेक्षा कोणत्या घटकामुळे ठळकपणे वेगळा आहे ते घटक लक्षात घेतले जातात. त्या विशिष्ट प्रदेशातील मानव व पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंधातील परिक्षण करण्याची प्रक्रिया प्रादेशिक भूगोलात आढळते. उपलब्ध घटकांची माहिती एकात्मिक भौगोलिक अविष्कार म्हणून गृहित धरली जाते. प्रदेशा प्रदेशातील भौगोलिक घटकांचा तुलनात्मक अभ्यासही प्रादेशिक भूगोलात केला जातो. तसेच भोवतालच्या प्रदेशाशी असलेले संबंध स्पष्ट केले जातात. यालाच **अभिक्षेत्रीय संबंध (Spatial Relation)** प्रादेशिक भूगोलात प्रदेशाचे व उपप्रदेशाचे सिमांकनही केले जाते. एखादया क्षेत्रातील प्रदेश ओळखणे त्याच्या वैशिष्टयानुसार विभागणी करणे यास **प्रादेशिकरण (regionalization)** म्हणतात. हा घटक ही प्रादेशिक भूगोलाचा अभ्यास घटक म्हणून समजला जातो. एखादया प्रदेशामध्ये उपप्रदेश, सुक्ष्म प्रदेश यांचे स्थान त्यातील आंतरक्रिया याचे पृथकरण प्रादेशिक भूगोलात केले जाते. या पक्रियेस सामान्यपणे प्रदेश वर्गीकरण असेही म्हणतात.

***********

## मानवी भूगोलाच्या अभ्यासाचे महत्त्व (Importance of Human Geography)

मानवी भूगोलाच्या अध्ययनाची उपयुक्ततेच्या दृष्टीने विशेष महत्त्व मानले जाते मानवी भूगोलाच्या अभ्यासाचे शास्त्रीय महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. मानवी भूगोलाच्या विविध उपशाखांच्या अभ्यासाद्वारे मानवाला आपल्या **दैनंदिन गरजा व समस्या** सोडवण्यासाठी तसेच त्याची तीव्रता कमी करण्यासाठी उपयोग होत आहे.

२. विविध घटकांच्या संदर्भात मानव आपले **नियोजन आणि व्यवस्थापन** करत असताना त्याला **आर्थिक–सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांची माहिती** व त्याचा भौगोलिक घटकांशी असणारा सहसंबंध या विविध मानवी भूगोलाच्या शाखा द्वारे माहिती होऊ लागला आहे.

३. **मानवाची उत्क्रांती, वांशिक वैशिष्टे, वांशिक वर्गीकरण** यांचे ज्ञान मानवी भूगोलातून मिळते त्याचा उपयोग मानवाचे अधिका अधिक व परिपूर्ण ज्ञान प्राप्त करण्यासाठी होतो.

४. मानवी भूगोलाच्या अभ्यासामुळे विविध प्रकारच्या **परिसंस्थांमधील मानवी जीवनाचे ज्ञान** होते. तेथील अनुकूल घटक, प्रतिकूल घटक, उणिवा व समस्यांचे आकलन होते या समस्येवर उपाय योजना करणे व जीवन पद्धतीत आवश्यक बदल करणे सोपे होते.

५. मानवाच्या **आर्थिक क्रियांचा आणि व्यवसायांचा पद्धतशीर अभ्यास** मानवी भूगोलाच्या आर्थिक भूगोल या शाखेद्वारे समजण्यास मदत होते.

६. मानवाच्या **आर्थिक क्रियांवर भौगोलिक घटकांचा होणारा प्रभाव**, मानवाच्या आर्थिक क्रियांचे स्वरूप, वितरण, आणि त्यांचा विकास याबद्दलचा माहिती होते.

७. साधनसंपत्तीचे **वितरण, वस्तूंचे उत्पादन, उपभोग, साधनसंपत्तीच्या समस्या, आणि केंद्रीकरण यांच्यावर नैसर्गिक घटकांचा होणारा प्रभाव** यांची माहिती मिळण्यास मदत होते.

८. **भौगोलिक घटकांचा कृषीवर होणारा प्रभाव, शेतीचे जागतिक पातळीवरील वितरण, या वितरणास** कारणीभूत असणारे घटक आणि तांत्रिक घटक या संदर्भात ज्ञान होते.

९. पृथ्वीच्या पृष्ठभागावर घेतल्या जाणाऱ्या विविध **पिकांवर, फळझाडांवर, तेथील नैसर्गिक व मानवनिर्मित घटकांचा कसा प्रभाव पडतो** याची माहिती मिळते.

१०. विशिष्ठ हवामान पट्ट्यात पिकाचे प्रकार, पिक रचना, पिक पध्दती, शेतीचे प्रकार, शेतीवर परिणाम करणारे घटक, शेतीच्या समस्या, शेतीची उत्पादकता त्यामध्ये उत्पादकता कशी बदलते व त्यानुसार भूपृष्ठावर विविध कृषी प्रदेशाची कशी निर्मिती होते, **शेतीपूरक विविध व्यवसाय, आधुनिक शेती, शेतीसंबंधीत क्षेत्रातील विविध क्रांत्या, शेती क्षेत्रातील विज्ञान** आणि तत्रंज्ञानाचा वाढलेला उपयोग याचे ज्ञान होते.

११. विविध पातळयांवर **शेतीचे नियोजन करत असताना कोणकोणत्या उपाययोजना करणे** आवश्यक आहे याची माहिती आपणास मानवी भूगोलाच्या अभ्यासातून समजण्यास मदत होते.

१२. **औद्योगीक प्रगतीवर नैसर्गिक घटकांचा सर्वाधिक प्रभाव** होत असतो. त्यामुळे पर्यावरणीय दृष्टीकोनातून औद्योगीक घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे हे समजण्यास मदत होते.

१३. **व्यापारांचे अभिक्षेत्रीय घटक, व्यापार, वस्तूंची प्रादेशिक विविधता, व्यापाराची दिशा, जागतिक व्यापार संघटना** इत्यादी घटकांचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो.

१४. जगामध्ये शेती, खनिजे, **साधनसंपत्ती यांचे वितरण असमान** झालेले आहे. त्यामुळे एखादया प्रदेशामध्ये एखादया वस्तूचे उत्पादन अधिक प्रमाणात होते. त्यामुळे **आयात निर्यात व्यापार कसा** विकसीत होतो हे समजण्या मदत होते.

१५. एखादया प्रदेशातील **आर्थिक विकास हा वाहतूकीच्या साधनांमुळे होतो.** किंवा वाहतूकीची साधने उपलब्ध नसल्यास तो खुंटतो वाहतूकीच्या साधनांचा विकासावरील प्रभाव माहिती होतो.

१६. **वाहतूक आणि दळणवळणावर भौगोलिक घटकांचा प्रभाव होत असतो**. एखादया प्रदेशातील भूपृष्ठरचना आणि हवामान हे दोन भौगोलिक घटक वाहतूक आणि दळणवळणाच्या विकासावर परिणाम करणारे निर्णायक घटक आहेत हे माहिती होते.

१७. **वाहतूकीचे प्रकार, मार्ग, साधने, समस्या, विकासावर परिणाम करणारे घटक, या सारख्या घटकांचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास होतो.** वाहतूक मार्गाचे जाळे, त्यांचे परस्परांशी समायोजन, त्यांचा प्रादेशिक विकासातील सहभाग, वाहतूकीसंदर्भाती धोरणे यांचाही अभ्यास अलीकडील होऊ लागलेला आहे.

१८. मानवी विकासात व **मानवाच्या विविध गरजा पूर्ण करण्यामध्ये साधनसंपदा** ही अतिशय महत्त्वाची असते हे समजण्यास मदत होते.

१९. ऊर्जा समस्या, जागतिक तापमान वाढ, निर्वणीकरण, जैवविविधतेचा ऱ्हास, पाणीटंचाई, जलप्रदूषण, या हवामनशास्त्रीय **आपत्ती व त्यांचे निवारण** करणेसंदर्भात उपाययोजना यांचे ज्ञान होते.

२०. **पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी** साधनसंपत्तीचा उपयोग कशाप्रकारे केला जावा साधनसंपत्तीचे जागतिक पातळीवर असणारे वितरण या संदर्भातील अनेक घटकांची माहिती होते.

२१. पर्यटनस्थळाचा उगम, विकास, त्याची रचना, प्रकार, पर्यटकांचा प्रकार, पर्यटनातील नव्याने विकसीत होत असणाऱ्या संकल्पना, पर्यटनाचे व्यावसायिक महत्त्व, निवासस्थाने, वाहतूक यांचा असणारा प्रभाव, पर्यटन संस्था, पर्यटनासंदर्भातील धोरणे तसेच **पर्यटन स्थळांचा तेथील सामाजिक आर्थिक बाबीवर झालेल्या परिणामाचा** अभ्यास करण्यात येतो.

२२.विपणन किंवा मार्केटींग ही एक व्यापक प्रक्रिया असून वस्तूंच्या उत्पादनानंतर विविध माध्यमांमधून ग्राहकांपर्यंत वस्तू पोहोचविणे हा **विपणन किंवा मार्केटिंगचा प्रमुख हेतू** असतो हे समजण्यास मदत होते.

२४.मानवाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बाबींवर भौगोलिक घटकांचा प्रभाव असतो. एखादया प्रदेशातील वांशिक रचना, धर्म, जात, भाषा, रूढी, परंपरा, चालीरिती, सण आणि उत्सव, लोकसंख्येची रचना, मानवाची वस्ती, राजकीय तसेच ऐतिहासीक वैशिष्टये या सारख्या **सामाजिक घटकांवर भौगोलिक घटकांचा प्रभाव** समजण्यास मदत होते.

२५.लोकसंख्येचे मोजमाप, लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येची रचना, वयोगट रचना, लिंग रचना, व्यवसायिक रचना, साक्षरता, लोकसंख्येचे स्थलांतर, नागरीकरण, लोकसंख्या विषयक धोरण, लोकसंख्या विषयक विविध सिद्धांत आणि प्रतिमाने या **लोकसंख्याशास्त्रीय घटकांबाबत सविस्तर माहिती** मिळते

२६.नगराचे स्थान, स्थिती, नगरचा ऐतिहासिक विभाग, नगर संरक्षण, नागरी कार्य, एका नगराची दुसऱ्या नगराची असलेले संबंध, नगराचे वर्गीकरण, नागरी प्रभाव क्षेत्र, नागरी समस्या, नगर श्रेणी रचना, नगरांतर्गत वाहतूक, नगराचा विस्तार इत्यादी घटकांचे ज्ञान होऊन **नागरीकरणाच्या नियोजनासाठी** हे ज्ञान महत्त्वाचे ठरते हे समजते.

२७.वसाहतींचा उगम, विकास, प्रारूप व त्यांचे वितरण, स्थलांतर, मानव समूहातील शारीरिक व सांस्कृतिक भिन्नता, आर्थिक व्यवसायांतील विविधता मानवाचे सांस्कृतिक वर्तन, वेगवेगळ्या समाजघटकांमधील परस्परसंबंध, सामाजिक गुन्हेगारी मानवी **समाजाचे अभिक्षेत्रीय वितरण यांची माहिती** मिळण्यास मदत होते.

२८.भाषा, वंश, धर्म, कला, चालीरिती, रूढी, परंपरा, सण, उत्सव, कर्मकांड, वर्णव्यवस्था, संस्कार, आख्यायिका, तत्त्वज्ञान व साहित्य पूजा अर्चा, यज्ञ विधी, पोषाख, नीतिविषयक कल्पना, सांकृतिक संकेत, लेखन कला, नृत्यकला, मूर्तीकला, स्थापत्य कला, जनांच्या मनात रूजलेली मिथके, या **सांस्कृतिक घटकांचे ज्ञान** होते.

२९.**राज्य, राष्ट्र, भूराजनिती,** आपल्या देशाच्या सीमांचे इतर देशाची सीमाशी संबंध, सीमाची स्थिती, राष्ट्रातील कायदे, आर्थिक स्थिती, आर्थिक धोरण, परदेशी धोरण, अंतर्गत धोरण, नद्यांचे, सागररांचे आणि पर्वतांचे सामरिक महत्त्व, **एखाद्या प्रदेशाचे भूराजनैतिक महत्त्व,** विविध प्रकारच्या **राजकीय समस्या, राजकीय संघटना, युध्द, मूलस्थाने, इत्यादी विषय माहिती** मिळते.

३०.ऐतिहासिक घटनांमध्ये तेथील भौगोलिक परिस्थिती कारणीभूत असते. कोणत्याही देशाचा विस्तार त्या भागातील पुनर्रचनेवर अवलंबून असतो. त्यामुळे **इतिहासाच्या अभ्यासामध्ये भौगोलिक परिस्थितीला असणारे महत्त्व समजण्यास मदत** होते.

३१.मानवाच्या आरोग्य व **स्वास्थ्य संबंधी घटकांवर प्रदेशातील पर्यावरणाशी घनिष्ठ संबंध** असतो तसेच विविध रोगांचे भूपृष्टावरील स्थळ काळातील वितरण व विश्लेषण माहिती होते.

३२.मानवी भूगोलाचे महत्त्व **भूगोलाच्या विकासाकरिता व राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची आखणी करताना** होते अशा प्रकारे मानवी भूगोलाच्या अभ्यासाचे वैज्ञानिक महत्त्व वैशिष्टपूर्ण मानले जाते.

HRM GEOG

**संदर्भ**


१. मानवी भूगोल (२०१९) – डॉ. ज्योतीराम मोरे, डॉ. संजय पगार, डॉ. अशोक थोरात – निराली प्रकाशन.

२. मानवी भूगोल (२०१५) – प्रा. सवदी, प्रा. कोळेकर – निराली प्रकाशन.

३. वस्ती भूगोल (२०११) – डॉ. सुरेश फुले

४. कृषी भूगोल (२००९) – शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण केंद्र संपादक – डॉ. पी. व्ही. पाटील, श्री. एच. पी. पाटील, श्री. ए. बी. पाटील

५. मराठी विश्वकोष – https://vishwakosh.marathi.gov.in/

६. https://www.wikipedia.org/